प्रकरण-1

# कादंबरी स्वरूप व चिकित्सा आणि मराठी ग्रामीण कादंबरी

## 1.1 प्रास्ताविक:

साहित्य ही मानवी मनाची एक अनन्यसाधारण अशी निर्मिती आहे. मानवाच्या पशूपासून मानव होण्याच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. म्हणूनच, मानवी संस्कृतीतील महत्त्वाच्या अंगांपैकी साहित्य हे एक सर्वात महत्त्वाचे अंग मानले जाते. मानवाच्या वैयक्तिक जीवनात आणि समाज जीवनात साहित्याला एक अपरिहार्य स्थान प्राप्त झालेले असते. मानवाला भाषा ही जैविक पद्धतीने प्राप्त होत नाही. भाषा शिकण्याची कळ(trigger) माणसाला जन्मजात प्राप्त झालेली असते पण भाषा ही सामाजिक अभिसरणातून शिकावी लागते. ध्वनी आणि त्यांना प्राप्त झालेले संकेत यांच्या माध्यमातून भाषा विकसित होत असते. असंख्य ध्वनीची निर्मिती करण्याचे सामर्थ्य माणसाजवळ असल्यामुळे, जगभरात हजारो भाषा निर्माण झाल्याचे आपल्याला दिसते. भाषा हा माणसाच्या बुद्धीचा एक चमत्कारच म्हटला पाहिजे. भाषा हा माणसाला परंपरेने लाभलेला अमूल्य ठेवा आहे. मानवी जीवनातील ज्ञान प्रक्रिया ही भाषेमुळेच अव्याहतपणे चालू असते. भाषा एक संकेत प्रणाली म्हणून विकसित झाली असल्यामुळे 'व्यक्त होणे' हे भाषेचे महत्त्वाचे लक्षण म्हणून सांगता येते. या 'व्यक्त होण्या'च्या प्रक्रियेतूनच साहित्याची निर्मिती झाली आहे. या संदर्भात प्रसिद्ध समीक्षक डॉ. सदा कऱ्हाडे यांनी मांडलेले विचार चिंतनीय आहेत. ते म्हणतात, "कोणत्याही वस्तूचा विचार जाती(,Genre) आणि उपजाती(Species) किंवा वस्तूचे प्रकार आणि वस्तूची उपप्रकार अशा पद्धतीने केला जातो. साहित्य ही वस्तूच आहे लाक्षणिक अर्थाने कला(Art) ही मूलतः अमूर्त (Abstract) 'वस्तू' आहे. नृत्य, नाट्य, संगीत आणि साहित्य ही कलेची व्यक्त अथवा मूर्त रूपे आहेत. कलेची निर्णायक व्याख्या करता येत नाही परंतु कलेची अंगभूत लक्षणे सांगता येतात. कला ही अभिव्यक्ती असते (Art is an expression) तसेच कला हे निवेदन अथवा संप्रेषण (Art is a communication) असते. म्हणजे अभिव्यक्ती आणि संप्रेषण ही कलेची लक्षणे आहेत तेच कलेचे मूल सत्त्व (Essence) आहे. सत्त्व म्हणजे असे तत्त्व की ज्याच्या अभावाने वस्तूचे अस्तित्वच सिद्ध होऊ शकत नाही. सत्त्व अरूप (without form) असते, पण ते अभिव्यक्त होते तेव्हा त्यातील सत्त्वाचा विस्तार होऊन त्याला रूप (form) प्राप्त होते. बीजामध्ये 'सत्त्व' असते सत्त्वाचा विस्तार होतो, तेव्हा त्याचा वृक्ष होतो. वृक्ष हे सत्त्वाचे प्रकटीकरण असते यालाच 'बीजवृक्ष' न्याय म्हणतात. हा न्याय कलेलाही लागू पडतो. 'भावानुभव' हे सत्त्व असते. भाषेच्या माध्यमातून हा 'भावानुभव' व्यक्त होतो तेव्हा 'साहित्य' आकारते. म्हणून 'साहित्य' म्हणजे भाषेच्या

माध्यमातून अनुभवाची अभिव्यक्ती, असे साहित्याचे लक्षण सांगितले जाते.”[1] साहित्य हे भाषेच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असल्यामुळे साहित्याचा अभ्यास करीत असताना साहित्याचा भाषेची असलेल्या संबंध लक्षात घ्यावाच लागतो. भाषा हे साहित्याचे माध्यम असते तसेच भाषा संस्कृतीचे वहन करीत असते. साहित्याचा अभ्यास करताना भाषिक विशेषांचा जसा अभ्यास करावा लागतो तसाच साहित्यामधून व्यक्त होणाऱ्या सांस्कृतिक विशेषांचा विचारही महत्त्वाचा असतो. वर उल्लेख केल्याप्रमाणे अनेक अभ्यासक भाषेकडे संप्रेषण व्यवहाराचे माध्यम म्हणून पाहतात. साहित्य हे भाषेच्या माध्यमातूनच व्यक्त होत असल्यामुळे ते देखील साहजिकपणे संप्रेषण माध्यमाचाच एक भाग ठरते. आपण साहित्याचे विविध प्रकार मानतो त्यामागे या संप्रेषणाच्या विविध पद्धती अनुस्यूत असतात. ‘बीजवृक्षन्यायाने’ असे म्हणता येईल की, साहित्य हे जाती आहे व कविता, नाटक, कथा, कादंबरी हे त्याचे उपप्रकार आहेत. आपल्या मनातील आशय व्यक्त करण्यासाठी ज्या प्रकारची संप्रेषण पद्धती स्वीकारतो त्यामधून हे विविध प्रकार आकार घेत असतात. लेखक आपल्या कलाकृतीतून मानवी समाजाचे, मानवी संस्कृतीचे, समग्र मानवी जीवनाचे दर्शन घडवीत असतो व हे घडवण्यासाठी त्याला अनुकूल अशा संप्रेषण पद्धतीचा वापर करीत असतो. या प्रक्रियेमधूनच विविध साहित्यप्रकार आकार घेतात. म्हणूनच साहित्याच्या विविध प्रकारांचा विचार करीत असताना हे प्रकार करण्यामागे भाषिक वैशिष्ट्य जशी कारणीभूत असतात तशीच सांस्कृतिक पार्श्वभूमी ही कारणीभूत असते हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**1.2 साहित्याचे वर्गीकरण**

साहित्याच्या विविधांगी व्याख्या करण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेकांनी केला असला तरी निर्णायक आणि अंतिम म्हणावी अशी साहित्याची व्याख्या आजपर्यंत कोणालाच करता आलेली नाही. यामागचे एक प्रमुख कारण म्हणजे जे गतीमान असते, परिवर्तनशील असते, विकसनशील असते, त्याला एका विशिष्ट साच्यात बसवणे कठीण असते. त्याची नेमकी व्याख्या करणे ही कठीण असते. या संदर्भात साहित्याची तुलना मानवी जीवनाशी देखील करता येईल. वरील सर्व लक्षणे मानवी जीवनालाही लागू पडत असल्याने मानवी जीवनाची ही परिपूर्ण व्याख्या आजपर्यंत कोणाला करता आलेली नाही. साहित्य आणि मानवी जीवन यातील हा अनुबंध लक्षात घेण्यासारखा आहे.

साहित्याचे 'कथात्म', 'नाट्यात्म' आणि 'भावकाव्यात्म' हे तीन मूलबंध असल्याचे मानले जाते. या मूलबंधांच्या आधारेच साहित्याचे वर्गीकरण केले जाते. एखादी संहिता विशिष्ट अशा मूलबंधांचे संकेतांचे पालन

करून साहित्यप्रकाराची निश्चिती करीत असते. काही संहिता या संकेतांचे अंशतः पालन करतात वा काही कडे हे संकेत धुडकावतात. काही संहिता या संकेतांची सरमिसळ करताना दिसतात. साहित्यातून व्यक्त होणाऱ्या मूलबंधांच्या तीव्रतेवरून त्या साहित्याचा प्रकार निश्चित केला जातो. त्यामुळेच, इमॅन्युएल कांट सारखे अनेक अभ्यासक साहित्यप्रकार हे नाममात्र असल्याचे मानतात व साहित्याची कलात्मकता सिद्ध करण्यास हे वर्गीकरण निरुपयोगी असल्याचेही म्हणतात. इमॅन्युएल कांट सारख्या काही अभ्यासकांचा हा दृष्टिकोन  असला तरी साहित्य व साहित्याचे विविध प्रकार यांच्यात एक नाते असते व प्रत्येक साहित्यप्रकाराला स्वतःचे असे स्वतंत्र अस्तित्व असते हे नाकारता येणार नाही. साहित्याच्या वर्गीकरणाची व्यवस्था म्हणूनही या साहित्याच्या विविध प्रकारांकडे पाहता येते. साधारणतः रचनेतील वेगळेपणा लक्षात घेऊन हे वर्गीकरण करण्यात येते. रचनेच्या तंत्रात बदल केला तर साहित्याच्या प्रकारातही बदल होणे शक्य असते. समान गुणवैशिष्ट्ये असलेल्या साहित्यकृतीचा वर्ग म्हणजे तो साहित्यप्रकार, असे म्हणता येते. साहित्यकृतीच्या या घाटाबद्दल वाचकाच्या त्याच्या साहित्यिक जाणिवेमधून काही कल्पना निर्माण झालेल्या असतात व त्या दृष्टिकोनातून वाचक त्या साहित्यकृतीचे वाचन करीत असतो.कादंबरी हा कथात्म अथवा कथाप्रधान साहित्यप्रकार आहे.

### 1.3 कादंबरी एक साहित्यप्रकार

आज कादंबरी हा सर्वात लोकप्रिय असा साहित्य प्रकार आहे. कथा, कविता, नाटक या इतर साहित्यप्रकारांचा विचार करता तो बऱ्याच अलिकडच्या काळात उदयाला आला आहे. साधारणतः अठरावे शतक हा कादंबरी वाङ्मयाचा उदयकाळ म्हणून सांगता येतो. अर्थात या साहित्यप्रकाराची मुळे आपणाला देशोदेशीच्या कथात्मक वाङ्मयात दिसून येतात. सायरसच्या शिक्षणांकरीता ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात लिहिलेल्या 'सायरोपिडीया'  किंवा ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकात ऐरिस्टिडने लिहिलेल्या 'मिलेशिका', बोकेशियोने 1353 मध्ये लिहिलेला 'डी कॅमरॉन' हा एकाच सूत्रात लिहिलेल्या शंभर कथांचा संग्रह, मादाम दी ला फॉयट्ची 'क्लॉव्हची राजकन्या' किंवा डिफोची 'रॉबिन्स क्रूसो' किंवा स्विपची 'गलिव्हर्स ट्रेव्हल्स'  या सर्व रचनांकडे कादंबरी लेखनाची पूर्वतयारी म्हणून पाहिले जाते. अठराव्या शतकात फिल्डिंग यानें आपले 'टॉम जोन्स, हे पुस्तक लिहिले तेव्हा आधुनिक कादंबरीचा जन्म झाला असे मानले जाते. काहीजण फिल्डिंग सोबत रिचर्डसन्, स्मॉलेट, स्टर्न व डॅनियल डिफो या सर्वांना मिळून आधुनिक कादंबरीचे जनक मानतात. नंतरच्या काळात वॉल्टर स्कॉट, गटे, पुष्किन्,ड्यूमा, एल्सेण्डो,यांनी कादंबरी लेखन अधिक लोकप्रिय केले व त्याचे स्वरूप निश्चित करण्यातही महत्त्वाची भर घातली. नंतरच्या

काळातील निकोलाय्, गॉगोल, टॉलस्टॉय, व डॉस्टाइव्हस्की, यांनी कादंबरीलेखन अधिक संमृद्ध केले. मोपासा या फ्रेंच कादंबरीकाराचे नावही या संदर्भात अग्रक्रमाने घ्यावे लागते. एकूणच पाश्चात्त्य परंपरेतून हा साहित्यप्रकार विकसित झाला आहे असे आपल्याला म्हणता येते. कुसुमावती देशपांडे सारख्या काही अभ्यासकांनी कादंबरी लेखनाची बीजे भारतीय परंपरेतही शोधण्याचा प्रयत्न केला आहे. संकृतमधील महाकाव्ये व खंडकाव्ये ही साधरणतः कादंबरी सदृशच आहेत. महाकाव्य आणि कादंबरी यांच्या रचनेत अशी काही समान सूत्रे असलेली दिसतात. प्रसिद्ध समीक्षक श्रीमती कुसुमावती देशपांडे यांनी, कादंबरी हा साहित्यप्रकार आधुनिक असला तरी त्याची बीजे फार पुरातन असल्याचे सांगून वेदकालीन वांङ्मयापर्यंत त्याचा संबंध जोडला आहे. या संदर्भात मराठीतील ज्येष्ठ समीक्षक डॉक्टर हरिश्चंद्र थोरात  यांनी व्यक्त केलेले मत निश्चितच लक्षात घेतले पाहिजे ते म्हणतात, "कादंबरीची निर्मिती ही महाकाव्यापेक्षा अत्यंत वेगळ्या तत्त्वावर साकार होणारी पात्र आणि घटनांची युक्त असलेली समष्टी' या विशेषावर आधारलेली असते."[2] कादंबरीचा विचार सामाजिक घटीतांच्या संदर्भात करावा किंवा तो तसा केला पाहिजे याचे सूचन डॉ. हरिश्चंद्र थोरात करताना दिसतात. डॉ. थोरातांचे हे विशेलेषण लक्षात घेता कादंबरी हे आधुनिक जगाचे अपत्य असून, त्याचा विचार आधुनिक काळाच्या संदर्भातच केला पाहिजे असे म्हणता येते. प्राचीन परंपरेत त्याची मुळे शोधण्यात विशेष अर्थ नाही असेही म्हणता येते. कुसुमावती देशपांडे यांनी कादंबरीच्या परंपरेच्या संदर्भात केलेले आणखी एक विधान मराठी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना विशेषतेने लक्षात घेतले पाहिजे. त्या म्हणतात, “ मराठशाहीतील गद्यरचनेच्या प्रकारांची आठवण बुजली नसती व त्यांच्या अवशेषांची जपणूक झाली असती तर फारशी किंवा इंग्रजीच्या साहाय्याशिवायही मराठी कादंबरी उत्क्रांत झाल्याळिवाय राहिली असती.”[3] त्यांच्या या प्रतिपादनातून आपले लोकसाहित्य, पोवाडे व बखर वाङ्मयाची परंपरा इंग्रजी काळात लयाला गेली नसती व त्यांची जपणूक झाली असती तर पाश्चात्त्य प्रभावाशीवायही आपल्याकडे कादंबरी सदृश वाङ्मय निर्माण झाले असते असे त्यांना म्हणायचे आहे, हे लक्षात येते. प्राचीन मराठी साहित्य परंपरांशी कादंबरीचा जुळणारा हा अनुबंध यातून सहजतेने लक्षात येतो. या परंपरेतूनच कुसुमावती देशपांडे म्हणतात त्या प्रमाणे कादंबरी उत्क्रांत झाली असती तर ती निश्चितच देशी संवेदना घेऊन आकाराला आली असती व आज आपण जो ग्रामीण कादंबरी म्हणून वेगळा अभ्यास करतो त्या ऐवजी कादंबरीची मुख्य धारा ग्रामीणतेच्या अवकाशातच विकसित झाली असती. म्हणूनच, ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना कुसुमावती देशपांडें यांचे हे मत विशेषतेने लक्षात घ्यावे लागते.

आजची आधुनिक मराठी कादंबरी ही पाश्चात्त्य परंपरेतून मराठीत अवतरली हे नाकारता येणार नाही. असे असले तरी कोणतीही कादंबरी आकार घेत असताना ती त्या ठिकाणच्या समाज जीवनातून, परंपरेतून, संस्कृतीतून आपले आशयद्रव्य निवडीत असते त्यामुळे तिला स्वतःचे असे एक वेगळे अस्तित्व प्राप्त झालेले असते. मराठी कादंबरीच्या संदर्भातही हे मान्य करावे लागेल. आधुनिक कादंबरीचा उदयाचा काळ हा तीनशे वर्षांपेक्षा जास्त नाही. युरोपात घडून आलेली औद्योगिक क्रांती, सुरू झालेले प्रबोधन युग, मानवाला केंद्रभूत ठेवून सुरू झालेली विचारप्रणाली या सर्वांमधून जो एक आमुलाग्र बदल युरोप व  एकूण जागतिक स्तरावर घडून आला, कादंबरी हे या बदललेल्या आधुनिक जगाचे अपत्य आहे. आधुनिक जगाचा आणि कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा कसा जवळचा संबंध आहे, यासंबंधातील विवेचन हरिश्चंद्र थोरात यांनी फार सूक्ष्म पणे केले आहे. ते म्हणतात, "आधुनिक जगाच्या बदललेल्या स्वरूपाचा आणि कादंबरीचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. एका बाजूला उदारमतवाद, व्यक्तिवाद आणि लोकशाही या संकल्पनांचा उदय झाला, तर दुसऱ्या बाजूला राजकीय आणि आर्थिक शोषणाचे वसाहतवादी तंत्रेही निर्माण झाली. एका बाजूने अज्ञानांधकार नष्ट करणाऱ्या तटस्थ ज्ञानाची ग्वाही विज्ञान देते, तर दुसऱ्या बाजूला विज्ञानामध्ये दडलेली सत्ताकांक्षाही स्पष्ट दिसते. आधुनिक जगाचे हे स्वरूप परस्पर विरोधांच्या कधी न मिटणाऱ्या ताणातून निर्माण झाले आहे. आधुनिक जगाच्या या परस्परविरोधयुक्त स्वरूपाचा आणि त्यामागील जीवनदृष्टीचा अधिक जवळचा संबंध कादंबरीशी आहे."[4] यावरून आपल्याला असे म्हणता येते की आधुनिक काळात तीव्र झालेला जीवनसंघर्ष, गतिमान झालेले मानवी जीवन, मानवी जीवनात निर्माण झालेले ताण आणि गुंतागुंत, विज्ञानाने केलेली प्रगती आणि त्यामधून निर्माण झालेले अद्ययावत तंत्रज्ञान व त्यामधूनच निर्माण झालेली समग्र विनाशाची शक्यता, या सर्वांचा मानवी जीवनावर खोलवर झालेला परिणाम, अशा या व्यामिश्र जाणिवांना समग्रपणे आपल्या कक्षेत सामावून घेणारा व आवश्यक तेथे स्वतःमध्ये बदल घडवून आणणारा साहित्यप्रकार म्हणून आज आपणाला कादंबरीकडे पाहता येते.

इंग्रजीमधील नॉव्हेल ( Novel) या संज्ञेला प्रतिशब्द म्हणून आपण 'कादंबरी' ही संज्ञा वापरतो. इंग्रजीत 'नॉव्हेल' ही संज्ञा रूढ होण्यापूर्वी रोमान्स (Romance)  ही संज्ञा रूढ होती. 'रोमान्स, म्हणजे अद्भुतरम्य कथा यात अविश्वसनीयतेचे अंग खूप मोठे असते. यातील वास्तवही कल्पित असते. 'नॉव्हेल' हा साहित्यप्रकार वास्तववादी असतो त्यातील वास्तव प्रत्यक्षातील असते. वास्तवाला कल्पिताचे रंग देऊन कलात्मक पातळीवरील मांडणी हे 'नॉव्हेल' चे आत्मतत्त्व असते. कादंबरीचे स्वरूप लक्षात येण्यासाठी हे विवेचन महत्त्वाचे आहे. मराठीमध्ये अशाप्रकारे विशिष्ट प्रकारच्या लेखनासाठी विशिष्ट संज्ञा रूढ आहेत, असे मात्र आपणाला

म्हणता येत नाही. आपण दीर्घ स्वरूपाच्या सर्वच कथात्मक लेखनासाठी कादंबरी ही संज्ञा वापरतो. निव्वळ कलात्मक किंवा अद्भुतरम्य अशा साहित्यकृतींसाठी आपल्याकडे वेगळी संज्ञा नाही. कादंबरीचा विचार करताना सर्व प्रकारच्या लेखनासाठी मराठीत ‘कादंबरी’ हीच संज्ञा असल्याने त्यातील वेगवेगळ्या प्रवाहांचा कादंबरीतील विविध प्रवृत्ती म्हणून विचार करावा लागतो. 'अद्भुतरम्य’, असलेल्या मुक्तामाला सदृश कादंबऱ्यांचा ही 'मुक्तामाला प्रवृत्ती' म्हणून उल्लेख केलेला आढळतो. कादंबरीच्या विश्लेषणात अभ्यासक प्रामुख्याने 'नॉव्हेल' स्वरूपाच्या कादंबऱ्यांचा विचार करीत असले तरी मराठीच्या संदर्भात हा अभ्यास अधिक क्लिष्ट झाला आहे हे निश्चित! कादंबरी हा साहित्यप्रकार पाश्चिमात्य परंपरेतून मराठीत अवतरला असला तरी या विशिष्ट वांङ्मयप्रकाराचा निर्देश करण्यासाठी जी संज्ञा मराठीत रूढ झाली आहे ती मात्र भारतीय परंपरेतून आल्याचे दिसते. संस्कृत साहित्यातील बाणभट्टाच्या 'कादंबरी' या साहित्यकृतीशी रचनेच्या दृष्टीने सारखेपणा असल्याने इंग्रजीतील 'रोमान्स' वा 'नॉव्हेल' या कथात्मक व रचनेच्या दृष्टीने दीर्घ असा साहित्यप्रकारांना अनुसरून जे लेखन मराठीत केल जाऊ लागले त्या लेखनाला मराठीत कादंबरी असे संबोधले जाऊ लागले. म्हणजे, मुळात विशेषनाम असलेले 'कादंबरी' हे पुढे सामान्यनाम झाल्याचे दिसते.या पाश्चात्त्य साहित्यप्रकाराला आपण 'देशी साज' सहजतेने चढवला आहे. सुरुवातीच्या काळात 'नॉव्हेल' साठी 'नवलकथा', 'नावल' असे शब्दही वापरले जात होते परंतु कालौघात हे सर्व शब्द मागे पडले व कादंबरी हा शब्द रूढ झाला.

**1.4 कादंबरीच्या विविध व्याख्या:**

आजपर्यंत अनेकांनी; अनेक प्रकारे, कादंबरीच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे पण निश्चित स्वरूपाची व्याख्या करणे कोणालाच शक्य झालेले नाही. कादंबरीची व्याख्या कशी असायला हवी या बद्दलची मॉरिस झेड. श्रोडर या अभ्यासकांनी व्याख्या उषा हस्तक यांनी श्री. पु. भागवत व इतरांनी संपादीत केलेल्या ‘साहित्य अध्यापन आणि प्रकार’ या ग्रंथातील त्यांच्या ‘कादंबरी’ या लेखात दिली आहे ती अशी, " and adequate definition of the novel would, of course, have to be totally comprehensive, exhaustive, and infallible. It would have to borrow at once from the history of literature, the study of external forms and the study of fictional matter of novels is general."[5] श्रोडरने उल्लेख केलेल्या सर्व घटकांचा अभ्यास केल्यानंतर देखील अभ्यासकांना कादंबरीची परिपूर्ण व्याख्या करता आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच जागतिक वाङ्मयीन संकल्पना कोशात, An extended fictional narrative in prose. The most protein of literary forms, the novel is the least amenable to formal

definition."[6] अशी व्याख्या देण्यात आली आहे. उषा हस्तक यांनी श्री. पु. भागवत व इतरांनी संपादीत केलेल्या 'साहित्य अध्यापन आणि प्रकार' या ग्रंथातील त्यांच्या कादंबरी या लेखात ही व्याख्या दिली आहे. कादंबरीच्या स्वरूपाचा, घाटाचा विचार करून व त्यातून व्यक्त होणाऱ्या आशयाचे सर्वसाधारण स्वरूप लक्षात घेऊन अनेकांनी कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे. यातील काही व्याख्यांचा आढावा घेतल्यास एकूण कादंबरीचे स्वरूप कसे आहे हे आपल्या लक्षात येईल. या संदर्भात प्रभा गणोरकर व इतरांनी संपादीत केलेल्या 'वाङ्मयीन संज्ञा सकल्पना कोशात' दिलेली कॅथरीन लिव्हर यांची व्याख्या महत्त्वाची आहे. "कादंबरी म्हणजे कथात्म लिखित गद्याचा बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा, लेखकांनी निर्मिलेल्या नव्याने आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंगवून टाकणारा रचनाबंध होय."[7] या व्याखेत कादंबरीच्या विविध वैशिष्ट्यांना एकाच व्याख्येत गुंफण्याचा प्रयत्न केला आहे. पाश्चात्त्य कादंबरीचा जनक असे ज्याला म्हटले जाते, त्या "फिल्डिंग'ने कादंबरीची व्याख्या करताना Comic epics in prose म्हटले आहे, "कादंबरी म्हणजे गंभीर वातावरण नसलेले गद्य महाकाव्य" [8] ही कादंबरीच्या सुरुवातीच्या काळातील व्याख्या आहे. जी प्र. वा. बापट व ना. वा. गोडबोले यांनी आपल्या 'मराठी कादंबरीः तंत्र आणि विकास' या ग्रंथात दिली आहे. ही व्याख्या कादंबरीचे महाकाव्याची असलेले नाते स्पष्ट करणारी आहे. नंतरच्या काळात कादंबरीचे स्वरूप कशाप्रकारे बदलले ते पाहता, या व्याख्येचा उणेपणा आपल्या लक्षात येतो. कादंबरीतील कथात्मकता तिच्या गद्य शैलीचा विस्तार आणि कादंबरीतील कलात्मकता या सर्वांचा विचार करून फ्रेंच लेखक व अभ्यासक एब्बले चॅव्हल्यी(Able Chevrolet) यांनी," A fiction in prose of a certain extent." जिला काही विस्तार आहे अशी गद्य कल्पित कथा म्हणजे कादंबरी"[9] अशी व्याख्या केली आहे. या व्याख्येत थोडक्यात पण कादंबरीची अनेक वैशिष्ट्ये त्यांनी सांगितले आहेत. न्यू इंग्लिश डिक्शनरी मध्ये दिलेली व्याख्या वरील व्याख्यान च्या जवळपास जाणारी आहे. A fictitious prose tale or narrative of considerable length in which, character and action professing to represent those of real life are portrayed in plot." भरपूर विस्तार असलेली, मानवी जीवनातील व्यक्ती व त्यांच्या कृतीचे कथानकातून दर्शन घडविणारी काल्पनिक गद्य गोष्ट किंवा कथा.[10] वरील एब्बले चॅव्हल्यी व न्यू इंग्लिश डिक्शनरी मधील दोन्ही व्याख्या श्री. मा. कुसकर्णी यांनी आपल्या 'कादंबरी रचना' या ग्रंथात दिल्या आहेत. वेन्स्टरच्या मते, कादंबरी म्हणजे, "and invented pros narrative of considerable length and a certain complexity that deals imaginatively through connected sequence of events involving group of persons in specific "विशिष्ट पद्धतीने एका

मानवी समूहाचे कल्पनेने जाणलेले अनुभव शृंखलाबद्ध घटनांद्वरे व्यक्त करणारी, मुद्दाम शोधून लिहिलेली, विस्तृत आणि गुंतागुंतीची अशी कल्पित कथा म्हणजे कादंबरी.[11] ही व्याख्या मानवी जीवनाला केंद्रस्थानी ठेवून केली आहे पण कादंबरीचा पट त्यापेक्षाही जास्त विस्तृत असतो असे म्हणता येते.

काही मराठी समीक्षकांनी देखील कादंबरीच्या व्याख्या केल्या आहेत. मा. का. देशपांडे यांनी, "कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत आणि कलात्मक गद्य चित्र"[12] असे म्हटलले आहे. श्री. मा. कुलकर्णी यांनी, "कार्यकारण शृंखला बद्ध, अशा कल्पित कथानकाद्वारे मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य-कथा म्हणजे कादंबरी."[13] असे म्हटले आहे. या दोन्ही व्याख्या म्हणजे वर निर्देश केलेल्या पाश्चात्त्य अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचे अनुकरण आहे. प्र. वा. बापट आणि ना. वा. गोडबोले या कादंबरीच्या वाङ्मयाच्या दोन महत्त्वाच्या अभ्यासकांनी कादंबरीची व्याख्या करताना, "सत्यसृष्टीच्या आधारे काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून, काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी अवलंबित जीवित घटना, यांचे गोष्टीरूपाने वर्णन करून व आनंदाची प्राप्ती करून, जीवनातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग म्हणजे कादंबरी"[14] अशी त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे बोजड वाटणारी व्याख्या केली आहे. मराठीतील महत्त्वाच्या समीक्षक उषा हस्तक यांनी कादंबरी संदर्भातील बऱ्याच व्याख्यांचा अभ्यास करुन कादंबरीच्या विविध अंगाचे दर्शन घडविणारी पाच वैशिष्टये सांगितली आहेत.

1) कादंबरी हे कथात्म गद्याचे भरपूर लांबी असलेले रुप आहे. तिला किमान लांबी तरी हवीच. त्याशिवाय कादंबरी म्हणून तिचे अस्तित्व जाणवणार नाही. तिच्या लांबीची किमान आणि कमाल मर्यादा सूचीत करण्यासाठी शब्दसंख्येचा आधार घेण्यात आलेला आहे.

2) या वाङ्मयप्रकारात कथानकाला किंवा निवेदनाला महत्त्व असते.

3) कादंबरीने व्यापलेल्या विषयांची वर्गवारी निश्चित करता येत नाही.

4) लघुकथा आणि लघु कादंबरी यांच्यापेक्षा तिला मानवी जीवन व्यवहाराचे दर्शन अधिक व्यापक स्वरुपात घडविता येते. कारण तिचा फलक तिच्याहून अधिक विस्तृत असतो.

5) घटना, व्यक्ती, वातावरण इ. घटकांच्या सहाय्याने मानवी जीवनाशी निगडीत असणाऱ्या वास्तवाच्या विविध स्तरीय संमिश्र रुपांचे दर्शन तिला घडविता येते. त्यासाठी सामान्यतः स्थलकालाच्या व्यापक पटाचा उपयोग केला जातो. [15]

उषा हस्तक यांनी अत्यंत सखोलतेने कादंबरीच्या विविध वैशिष्ट्यांचा वेध यामधून घेतला आहे.

“पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शी तत्त्वांचा किंवा अद्भुताचा मार्ग धरून मुलत: मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन, जीवन विषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री, चिकित्सक वृत्ती हा दृष्टिकोन हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तीचित्रांच्या एका विशिष्ट विस्तृत आकर्षक कथानकाच्याद्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पद्धती."[16] कुसुमावती देशपांडेनी कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या सर्व शक्यताना आपल्या व्याखेतून कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रा. रा. ग. जाधव हे मराठीतील महत्त्वाचे समीक्षक आहेत. ते आपल्या व्याख्येत म्हणतात, "कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली, इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी."[17] प्रा. रा. ग. जाधव यांनी ही व्याख्या तकतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संपादीत केलेल्या मराठी विश्वकोशाच्या खंड तीन मध्ये कादंबरीवरील नोंदी देताना केली आहे. प्रा. जाधव आपल्या व्याख्येतून कादंबरीची रचना स्पष्ट करताना दिसतात. मराठीतील आणखी एक महत्त्वाचे समीक्षक डॉ. हरिश्चंद्र थोरात यांनी कादंबरीची व्याख्या करताना, "आपल्या विशाल भाषिक अवकाशात आणि सर्वसमावेशक वृत्तीच्या सहाय्याने आधुनिक मानवी जीवनाचा सतत रंग बदलणारा आकार आणि पसारा कवेत घेण्याची कुवत असलेला साहित्यप्रकार म्हणजे कादंबरी."[18] असे म्हटले आहे. भाषिक अवकाशाचे कादंबरी वाङ्मयला असलेले परिमाण व मानवी जीवनाचा कादंबरी लेखनाला असलेला संबंध डॉ. थोरात यांनी प्रामुख्याने आपल्या व्याख्येतून व्यक्त केला आहे. या सर्व व्याख्यांचा आढावा घेतल्यानंतर आणखी एका महत्त्वाच्या अभ्यासकाने म्हणजेच, डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी कादंबरी संबंधीचे जे विवेचन केले आहे ते थोडे विस्ताराने पाहिले पाहिजे. कादंबरी या वांङ्मय प्रकाराचा आढावा घेताना त्यांनी कादंबरीचा रूपबंध निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कादंबरीपेक्षा इतर सर्व गद्य रूपबंधातील भाषिक अवकाश हा चिंचोळा असतो व त्यामुळे स्थळकाळाचे संकुचित दर्शन या प्रकारात घडते. यातून व्यक्त होणारे संवेदन मात्र तीव्र असते, असे ते म्हणतात. लघुकादंबरीत अवकाशाचा विस्तार होत असला, स्थलकालाच्या मीति वाढत आशयसूत्रांचे पदर वाढत असले तरी कादंबरीचा आवाका लघुकादंबरीच्या तुलनेने प्रचंड असतो, हे त्यांनी स्पष्टपणे सुचविले आहे. कादंबरीची व्याख्या करताना ते म्हणतात, "कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी आणि पात्रे, प्रसंग-अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत, अशी साहित्यकृती असते. सामाजिक असा आशय विशाल असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासकट मांडलेला असतो. एखाद्या समूहाचे

संस्कृतीचे दर्शन घडविलेले असते. एखाद्या पोटसमूहाचे, पोटसंस्कृतीचे, तपशीलांसह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो, आशयसूत्रे बळकट असतात, पात्रे सलग उभी असतात.[19] अशा प्रकारे त्यांनी कादंबरी या साहित्यप्रकाराचे विस्तृत विश्लेषण केले आहे. वरील घटकांचा विचार केल्यास मराठीतील श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून ज्यांना गणले जाते ते सामान्य दर्जाचे कथाकार ठरतील असे त्यांनी म्हटले आहे. त्यांचे विश्लेषण कादंबरी या साहित्य प्रकारात बद्दल मूलगामी विचार करायला लावणारे आहे. या सर्वच व्याख्यांचा विचार केल्यानंतर, कादंबरी या साहित्यप्रकाराची नेमकी व्यवस्था कशी लावायची? हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. यातून कादंबरी या साहित्य प्रकाराबद्दलची गुंतागुंत देखील वाढते. या सर्व अभ्यासकांनी कादंबरी या वांङ्मयप्रकाराचे स्वरूप निश्चित करण्याचा आपल्या परीने चांगला प्रयत्न केला आहे. पण कालानुरूप कादंबरी वांङ्मय प्रकारात सतत बदल होत असल्यामुळे, कादंबरीची नेमकी व्याख्या करता येणे शक्य नाही. अशी नेमकी व्याख्या करता न येणे हे देखील कादंबरीचे एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. ज्यानी ज्यानी कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे त्या बहुतेकानी कादंबरीतून व्यक्त होणारे समाजवास्तव व कादंबरीतून घडणारे जीवन दर्शन यांना सर्वात जास्त महत्त्व दिले आहे. वरील सर्व विवेचनावरून कादंबरी हा किती व्यामिश्र व व्यापक स्वरूपाचा साहित्यप्रकार आहे हे आपल्या लक्षात येते. जीवनाच्या सर्वच अंगाना स्पर्श करण्याचे सामर्थ्य आधुनिक काळात फक्त कादंबरी याच साहित्यप्रकाराकडे आहे. म्हणून कादंबरी हा आधुनिक काळातील सर्वात महत्त्वाचा साहित्यप्रकार ठरला आहे. दिवसेंदिवस गुंतागुंतीचे होणारे जीवन, आधुनिकतेमुळे जीवनाला आलेली यंत्रवत गती आणि वेगाने बदलणारे सामाजिक वास्तव. या सर्व गोष्टींचा समग्रपणे आपल्या कवेत घेण्याचे सामर्थ्य आज तरी फक्त कादंबरीत असल्याचे जाणवते. साहित्य म्हणजे समाज जीवनाचा आरसा किंवा आवतीभोवतीच्या जगाच्या निरीक्षणाची खिडकी या कल्पना कादंबरी संदर्भातच अन्वयार्थक ठरतात. परिवर्तनशीलता हाच साहित्याचा अंगभूत गुण म्हणून सांगता येतो. कादंबरी संदर्भात ही परिवर्तनशीलता जास्त तीव्रपणे नजरेत येते. विशिष्ट सामाजिक सांस्कृतिक ऐतिहासिक संदर्भात ज्या कल्पनांचा उदय होतो; नवे विचार, नव्या जाणिवा, उत्क्रांत होतात त्यांचे प्रतिबिंब कादंबरी या साहित्य प्रकारात जास्त तीव्रतेने दिसून येते. म्हणजेच, कादंबरीला काळाचे परिमाण लाभलेले असते. विशिष्ट काल व वास्तव यांचा एक अनुबंध कादंबरी वांङ्मयात पाहायला मिळतो. सामान्यपणे कादंबरीच्या संरचनेत विषयवस्तू, कथानक, व्यक्तिरेखा, पार्श्वभूमी निवेदनशैली या गोष्टींचा समावेश असतो पण हे सर्व घटक कादंबरीत वेगवेगळे येत नाहीत तर त्या सर्वांमध्ये एक सेंद्रियता असते व या मधूनच, कादंबरीचे नेमके स्वरूप निश्चित होत असते. या स्वरूप निश्चितीमध्ये लेखकाचा दृष्टीकोण

किंवा त्यांची नैतिकता ही सर्वात जास्त महत्त्वाची असते. स्वतःच्या दृष्टिकोणांतून काल आणि वास्तवाचा अनुबंधाला वाङ्मयीन आकार देण्यासाठी कादंबरीकार वेगवेगळे रूपबंध स्वीकारत असतो आणि यामुळेच कादंबरीचा रचनेला आव्हान देण्याचे प्रकार वेळोवेळी होताना दिसतात. यामधून कादंबरीचा विशाल पट व तिच्या बांधणीतील लवचीकता पुन्हा पुन्हा अधोरेखित होते व कादंबरी या वांङ्मयप्रकारला अधिक संपन्नता प्राप्त होते. कादंबरी हा सर्वात अधिक व्यामिश्र, सर्वाधिक वैविध्यपूर्ण आणि सर्वाधिक लोकप्रिय वाङ्मय प्रकार मानला जातो, त्यामागील कारण हेच असावे.

**1.5 ग्रामीण कादंबरी:**

एकूण मराठी कादंबरीच्या प्रवासाचा विचार करता, ग्रामीण कादंबरी हा त्यातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. कादंबरीची सुरुवात इंग्रजी कादंबरीच्या परिशीलनातून झाली असली तरी कालौघात तिला देशी परिमाणे हळूहळू प्राप्त होऊ लागली. ग्रामीण कादंबरी हे मराठी कादंबरी वाङ्मयाला लाभलेले सर्वात मोठे देशी परिमाण आहे असे आपणाला म्हणता येते. या संदर्भात प्रसिद्ध समीक्षक किशोर सानप यांनी केलेले विवेचन लक्षात घेण्यासारखे आहे ते म्हणतात, “ग्रामीण साहित्य हा पाश्चात्त्य संस्कृतीच्या अभ्यासाने प्रेरित झालेल्या आधुनिक मराठी साहित्याचा एक भाग आहे, असे स्वतः आनंद यादव आणि म्हटले आहे. तेव्हा एकूण आधुनिक वाङ्मयाच्या प्रेरणा ह्या देशी आणि प्राचीन वांङ्मयाशी नाळ जोडणाऱ्या नव्हत्या हे स्पष्ट होते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात काही ग्रामीण कादंबऱ्यांची निर्मिती झालेली आहे. अनुकरणातून आलेल्या प्रेरणा आणि पांढरपेशी जीवनातून निर्माण झालेल्या कादंबरीतील तोचतोचपणा लक्षात घेऊन नव्या जीवनाचे चित्रण करण्याची हौस म्हणून ग्रामीण कादंबऱ्यांची निर्मिती झाली. 1950 नंतर मात्र ग्रामीण कादंबरी वास्तवाभिमुख आणि देशी या जाणिवेतून निर्माण होताना दिसते. एकूण शंभर वर्षांचा इतिहास ग्रामीण कादंबरीला आहे. या शंभर वर्षात मराठी समीक्षेतही ग्रामीण कादंबरीचे नेमकेपण मांडले गेले आहे. ग्रामीण कादंबरी ही मराठी कादंबरीला प्राप्त झालेले वैभव आहे.”[20] किमान शंभर वर्षंची परंपरा असलेलल्या या ग्रामीण कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न आज पर्यंत अनेकानी केला आहे. अर्थात बऱ्याच जणानी व्याख्या करताना फक्त ‘ग्रामीण कादंबरी’ असा विचार केलेलला नाही, तर अनेक व्याख्या या एकूण ग्रामीण साहित्य म्हणून केलेल्या आहेत, ज्या ग्रामीण कादंबरीलाही लागू पडणाऱ्या आहेत. यातील काही व्याख्यांचा आढावा घेतल्यास आपणाला एकूण ग्रामीण कादंबरीचे नेमके स्वरूप काय आहे हे लक्षात येऊ शकते. ‘वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोशा’त ग्रामीण साहित्याची व्याख्या देताना, " ग्रामीण वास्तव, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण बोली यांचा वापर करणारे साहित्य, खेडी व त्यांचा परिसर व त्यात

वावरणारी माणसे, त्यांचे जीवन हे ग्रामीण साहित्याचे कथनकेंद्र असते. खेड्यातील माणसांच्या जीवनरीती, श्रद्धा विश्वे, शेती व निसर्ग यांच्याशी असणारे भावबंध, ग्राम व्यवस्थेतील बलुतेदारी, सामाजिक आर्थिक संबंधांची पारंपरिक व्यवस्था, आधुनिक काळात आलेली पंचायत राज्य व्यवस्था, सहकार तत्वावर चालणाऱ्या विविध संस्था, यंत्र संस्कृतीचे ग्रामीण जीवनावर झालेले आक्रमण व त्यांचे परिणाम, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने बदलत चाललेले ग्रामीण जीवन, तेथील व्यक्ती व समूह यांतील ताण ही ग्रामीण साहित्याची आशयसूत्रे असतात.[21] ही व्याख्या एकूण ग्रामीण या संकल्पनेला आवाक्यात घेणारी तर आहेच पण ग्रामीण साहित्याची व्यापकता ही स्पष्ट करणारी आहे. ग्रामीण साहित्याचा मूलगामी अभ्यास करणाऱ्यांमध्ये आनंद यादव हे नाव अग्रभागी आहे; त्यांनी ग्रामीण साहित्याची केलेली व्याख्या मुद्दामहून अभ्यासली पाहिजे. त्यांनी सलग अशी एक ग्रामीण साहित्याची व्याख्या केली नसली तरी, त्यांनी जे विवेचन केले आहे त्यावरून त्यांची ग्रामीण साहित्यासंबंधीची व्याख्या आपणाला सिद्ध करता येते. आनंद यादव ग्रामीण साहित्याचा विचार करताना 1960 पूर्वीचे ग्रामीण साहित्य आणि 1960 नंतरचे ग्रामीण साहित्य असा भेद स्पष्टपणाने करतात व 1960 नंतरच्या साहित्याचाच ते ‘ग्रामीण साहित्य’ या संकल्पनेच्या संदर्भात विचार करतात हे स्पष्टपणे जाणवते. त्या संदर्भातील विवेचनही ते करतात. त्यांच्या मते, “स्वातंत्र्योत्तर काळात बहुजन समाजाचे आर्थिक, सामाजिक, ज्ञानात्मक आणि शैक्षणिक पातळीवर विकसन होऊ लागले. एवढी वर्षे सर्वच बाबतीत वंचित राहिलेल्या ग्रामीण समाजाला लोकशाहीमुळे आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली आणि त्यांचे सामाजिक प्रबोधनही सुरू झाले. त्याचबरोबर, या समाजाचे विघटन देखील सुरु झाले. उद्योगप्रधान संस्कृतीमुळे वर्गव्यवस्था निर्माण होऊ लागली त्यामुळे अनेक वर्णातील लोक एका वर्गात येऊन सामील होऊ लागले. नवी वर्गव्यवस्था निर्माण झाली. हजारो वर्षे चालत आलेली वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था ही कमी-जास्त प्रमाणात सूक्ष्म स्वरूपात कार्यरत होतीच. या विघटनाचा सांस्कृतिक प्रबोधन हा देखील एक भाग आहे. ग्रामीण साहित्य हे हा या विघटनाचाच एक पैलू आहे. 1960 च्या आसपास ग्रामीण साहित्याच्या संदर्भात सामाजिक आणि वाङ्मयीन परिस्थिती बदलली आणि यातूनच 1960 नंतरचा ग्रामीण लेखक पुढे आला. दुसऱ्या पिढीच्या या लेखकवर्गातील बहुतेक ग्रामीण साहित्य हे त्यांनी स्वतःच्या प्रत्यक्ष घेतलेल्या अनुभवातून निर्माण झाले आहे. हजारो वर्षे मुका राहिलेला हा ग्रामीण परिसरातील वर्ग महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा बोलका झाला, त्याला वाचा आली! या नव्या लेखक वर्गाबरोबरच नवा वाचक वर्गही ग्रामीण विभागातून तयार झाला. ग्रामीण साहित्य हे आपले साहित्य, आपल्या भावना व्यक्त करणारे साहित्य असे त्याला वाटू लागले आणि मोठ्या आत्मियतेने तो ग्रामीण साहित्याच्या

आस्वादनानाकडे वळला. नव्या ग्रामीण वाचकांसमोर मनोरंजन एवढे एकच ध्येय नाही मनोरंजन हे तर त्याला हवेच असते पण आपल्या जीवनाचा त्याला त्यात अनुभव येतो. आत्मप्रत्ययासाठी तो वाचत असतो. साहित्य ही 'कलावस्तू' असते तशी ती एक 'सांस्कृतिक घटना' ही असते तिला एक सामाजिक सांस्कृतिक संदर्भ असतो. 1960 नंतर निर्माण होत असलेल्या ग्रामीण साहित्याला असाच एक नवा सामाजिक सांस्कृतिक संदर्भ आहे. हे साहित्य नीट समजून घ्यायचे असेल तर हे सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेतले पाहिजेत. ग्रामीण साहित्य हे मराठी साहित्याचे भाग आहे, ते वेगळे मुळीच नाही. असे असले; तरी शहरनिष्ठ मनोवृत्तीतून निर्माण होणारे, शहरातील पांढरपेशा वर्गीय जीवनाचे प्रतिबिंब असलेले, खेड्यापासून परान्मुख झालेले मराठी साहित्य विपुल प्रमाणात निर्माण होते. तुलनेने ग्रामीण साहित्य अत्यल्प प्रमाणात निर्माण होते. आज ग्रामीण साहित्याला एक विशेष महत्त्व आहे. पाश्चात्त्य संस्कृतीचे उपरी बेटे होऊ पाहणाऱ्या पाच-सात शहरांच्या बाहेर महाराष्ट्रभर पसरलेल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीचा गाभा असलेल्या जेथे 80% मराठी मानवसमूह वस्ती करून आहे अशा ग्रामीण समाजात स्वातंत्र्योत्तर काळात जे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कृषीविषयक, ज्ञानात्मक पातळीवर, सर्वांगीण विकासाच्या पातळीवर मंथन चालले आहे, जेथे बदल होत आहेत, त्याच्या परिणामातून ग्रामीण साहित्याची निर्मिती होत आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्य हे या भूमीच्या मातीतून निर्माण होणारे अस्सल देशी साहित्य मानावे लागते".[22] या सर्व विवेचनातून डॉ. आनंद यादव जे सांगू पाहतात ते महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, ग्रामीण साहित्य म्हणजे पांढरपेशा शहरी संवेदनशीलता व्यक्त करणाऱ्या आणि पाश्चिमात्य साहित्याच्या जीवन जाणिवांवर पोसलेल्या उपऱ्या साहित्यापेक्षा पूर्णपणाने वेगळे असलेले, पूर्णपणाने वेगळ्या आणि देशीवादी जाणिवांनी युक्त आणि ग्रामीण संवेदना व्यक्त करणारे साहित्य ते 'ग्रामीण साहित्य'. जे शहरी पांढरपेशी साहित्य-संस्कृती पेक्षा पूर्णपणाने वेगळे असे साहित्य आहे, हे त्यांना आपल्या एकूण विवेचनातून अधोरेखित करायचे आहे. इतर ही काही अभ्यासकांनी ग्रामीण साहित्याबद्दल जे विश्लेषण केले आहे त्या आधारे आपणाला ही संकल्पना अधिक चांगल्यारित्या समजून घेता येईल. ग्रमीण साहित्याचे आणखी एक महत्त्वाचे अभ्यासक म्हणजे डॉ. नागनाथ कोत्तापल्ले ग्रामीण साहित्यासंबंधी विश्लेषण करताना अनेक गोष्टी त्यांनी विचारात घेतल्या आहेत. ग्रामीण साहित्य या शब्दप्रयोगातील ग्रामीण हे विशेषण भौगोलिक, प्रादेशिक, निसर्ग इ. शी निगडित आहे हे सांगताना, ग्रामीण साहित्यातून ज्या ग्रामीण जीवनाचे अनुभव व्यक्त केले जातात त्या ग्रामीण जीवनाचा भौगोलिक संदर्भ शहरी साहित्यातील शहरी जीवन संदर्भापेक्षा वेगळा आहे याची नोंद त्यांनी केली आहे. ग्रामीण जीवनपद्धती ही शहरी जीवन पद्धतीपेक्षा, संस्कृतीपेक्षा, परंपरेपेक्षा वेगळी आहे. भाषाही वेगळी आहे. ग्रामीण

जीवनाला शाहिरी वांङ्मयाची परंपरा ही पंडिती वाङ्मयाच्या परंपरेपेक्षा जवळची आहे हे सांगून, 1920 पर्यंतच्या मराठी साहित्यात ग्रामीण जीवनानुभवाला स्थान नव्हते हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. ग्रामीण जीवन हा वेगळेपणाने उठून दिसणारा भाग असला तरीही मुलतः मराठी जीवनाचा तो एक भाग आहे. ग्रामीण जीवनाचा अनुभवाविष्कार मराठी साहित्यात प्रारंभीच्या काळी नसला तरी 1925 पासून तो होऊ लागला. हा आविष्कार पुरेशा प्रातिनिधिक व वास्तव स्वरूपात होताना मात्र दिसत नव्हता. एकूणच मराठी जीवनाचा राजकीय इतिहास, हिंदू धर्म, परंपरा, जाती, वंशपरंपरा, काही वांङ्मयीन परंपरा, काही सांस्कृतिक परंपरा , शहरवासीयांना व ग्रामीण यांना समान आहेत. ग्रामीणांची भाषा वेगळी असली तरी ती मराठी प्रमाण भाषेची बोलीभाषा आहे. सारांश ग्रामीण या विशेषणांमुळे साहित्यक्षेत्रात भौगोलिक संदर्भ, भाषिक संदर्भ, साहित्य परंपरांचा संदर्भ, कृषिप्रधान जीवनसंदर्भ निर्देष्टित केले जातात. 'ग्रामीण साहित्य हे भौगोलिक, प्रादेशिक आणि नैसर्गिक वैशिष्ट्यांची जोडलेले असते' हे कोत्तापल्ले यांचे मत ग्रामीण साहित्य संदर्भात फार महत्त्वाचे आहे. एकूण ग्रामीण साहित्याचा विचार हे घटक मुलभूत मानूनच करावा लागतो कारण हे घटकच ग्रामीणतेचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून सांगता येतात. त्याचप्रमाणे ज्याला खऱ्याअर्थाने ग्रामीण साहित्य म्हणता येईल असे साहित्य 1925 नंतरच अस्तित्वात आले हे त्यांचे मतही एकूण ग्रामीण साहित्याचा विचार करताना महत्त्वाचे आहे. विशेषतः ग्रामीण साहित्याच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करताना हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. ग्रामीण साहित्य हा एकूण मराठी साहित्याचा एक भाग आहे हे स्पष्ट करताना, त्यातील समानतेचे दुवे देखील त्यांनी स्पष्टपणाने दाखवले आहेत. ग्रामीण साहित्याचा वेगळा विचार करतानाही मूळ साहित्यिक परंपरेशी या साहित्याचा कोणताही सवतसुभा नाही हे त्यांना यातून अधोरेखित करायचे आहे, असे म्हणता येईल. दलित साहित्यांने प्रचलित साहित्याच्या सर्व परंपरा व सर्वच मापदंडच नाकारण्याची घेतलेली भूमिका या ठिकाणी लक्षात घेतली पाहिजे. या पार्श्वभूमीवर मूळ परंपरेशी नाते सांगतच ग्रामीण साहित्याचे स्वतःचे वेगळेपण मांडण्याचा केलेला प्रयत्न हा लक्षणिय आहे. ग्रामीण साहित्याच्या संदर्भात द. ता. भोसले यांनी केलेल्या व्याख्येचे देखील आपण अवलोकन केले पाहिजे. ते म्हणतात, "आजच्या ग्रामीण साहित्यात भूक, दारिद्र्य, अज्ञान, शोषण आणि उपेक्षा या गोष्टीतून उद्ध्वस्त झालेल्या जीवनाचे चित्रण येते आहे. या प्रेरक घटनांचा संदर्भ वेगळा असेल भूक किंवा दारिद्र्याचे स्वरूप भिन्न असेल त्याची तीव्रता कमी अधिक असेल पण शेवटी त्या भावना म्हणून तशा एकच म्हणाव्या लागतील या पाच बाबींचे चित्रण म्हणजे ग्रामीण साहित्य म्हणावे लागेल."[23] द.ता. भोसले ज्या गोष्टींचा उल्लेख करतात त्या गोष्टी ग्रामीण साहित्यात येतात हे खरे पण त्या कमी अधिक फरकाने ग्रामीणेतर साहित्यातही येतात, त्यामुळे हे

ग्रामीण साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून मान्य करता येईल असे वाटत नाही किंवा ग्रामीण साहित्य म्हणजे वेगळे असे काही नाही. प्रचलित साहित्यातून ज्या गोष्टी व्यक्त होतात त्याच ग्रामीण साहित्यातून व्यक्त होतात. फक्त त्याचे स्वरूप वेगळे असते, असे त्यांना म्हणायचे आहे का? हा प्रश्नही मनात निर्माण होतो. पण त्यांची एकूण मांडणी पाहता त्यांना ग्रामीण साहित्याचे वेगळेपण मान्य आहे; एवढेच नव्हे, तर ते त्याचे पुरस्कर्तेही आहेत असे दिसते. त्यांची ग्रामीण साहित्याबद्दलची व्याख्या मात्र संदिग्ध स्वरूपाची आहे. ग्रामीण साहित्याचे आणखी एक भाष्यकार म्हणजे वासुदेव मुलाटे! त्यांनी ग्रामीण माणसाला केंद्रस्थानी ठेवून केलेली व्याख्या तेवढीच महत्त्वाची आहे. ते म्हणतात, “ग्रामीण संकल्पनेत ग्रामीण जीवन अपेक्षित आहे. ग्रामीण माणसाचे जगणे, वागणे, राहणे, आचार-विचार, दृष्टिकोन, भावभावना, यांना महत्त्व आहे. त्याची स्वतःची काही एक जीवनदृष्टी असते. त्या अनुषंगाने जगण्याविषयीचे त्याचे तत्त्वज्ञान, कल्पना असतात. यातून त्यांच्या मनात निर्माण होणारे भाव आणि भावना यांनाही येथे महत्त्वाचे स्थान आहे. नुसते निसर्गचित्र रेखाटले, ग्रामीण माणसाचे वागणे, बोलणे, चालणे, लकबी, त्याचे रंग-ढंग, त्यांची भांडणे, भानगडी, कुलंगडी, एवढेच लक्षात घेऊन चालत नाही किंवा त्याच्या जीवनातील नुसते घटना प्रसंग विचारात घेऊन चालत नाहीत तर लक्षात घ्यावे लागते ते त्याचे मन, त्याच्या मनाचे व्यापार, त्यांच्या मनातील आंदोलने, ताण-तणाव, जीवनविषयक दृष्टी, आचार-विचार, निसर्ग, वातावरण, परिस्थिती यातून त्यांच्या काही वैशिष्ट्यपूर्ण अशा जाणिवा निर्माण झालेल्या असतात. या जाणिवाच ग्रामीण या संकल्पनेत सर्वात अधिक महत्त्वाच्या असतात...... ग्रामीण हे विशेषण नुसतं स्थलनिर्देशक नाही तर विशिष्ट अशा जाणिवांचा निर्देश करणारे आहे. येथे आशयाला विशेष स्थान आहे.”[24] मुलाटेनी मांडलेला ग्रामीण मानसिकतेचा विचार खूपच महत्त्वाचा आहे. खरेतर आपण जेव्हा एखादा वेगळा वाङ्मयीन प्रवाह मानतो तेव्हा त्यातील वेगेपणात ते साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकाच्या मानसिक जडणघडणीतील वेगळेपणा हा खूपच महत्त्वाचा असतो. ‘पांढरपेशी’ किंवा ‘सदाशीव पेठी’ असे शब्दप्रयोग जेव्हा आपण वापरतो तेव्हा आपण या विशिष्ट मानसिकतेचा निर्देश करीत असतो हे या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. मुलाटे ग्रामीण मानसिकतेच्या संदर्भात ग्रामीण साहित्याचे वेगळेपण सिद्ध करण्याचा जो प्रयत्न करतात तो प्रयत्न म्हणूनच खूप महत्त्वाचा आणि ग्रामीण साहित्याच्या संकल्पनेला वेगळा आयाम देणारा असा आहे. रा.ग. जाधवांची ग्रामीण साहित्यासंदर्भातील व्याख्या संग्राम टेकले यांनी संपादीत केलेल्या ग्रामीण कादंबरी आस्वाद आणि समीक्षा या पुस्तकातील ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी लिहिलेल्या लेखात देण्यात आली आहे. या व्याख्येतील ग्रामीण साहित्याच्या पृथकत्त्वाच्या मागील ऐतिहासिक संदर्भ महत्त्वाचा वाटतो. ते आपल्या व्याख्येत म्हतात, “ग्रामीण साहित्याच्या पृथकत्त्वाच्या

जाणीवेमागे जो ऐतिहासिक संदर्भ आहे तो नीटपणे लक्षात घेतला पाहिजे. मुख्यता स्वतंत्र भारताच्या स्वतंत्र समाजाचा हा ऐतिहासिक संदर्भ आहे. आज-उद्याच्या भारतीय समाजाची ध्येय धोरणे या स्वतंत्र समाजाने निश्चित केली आहेत. ग्रामीणतेचे सर्जनशील भान म्हणजे या नवरचनेच्या आशयाचे व आकृतिबंधाचे भान होय."[25] या ठिकाणी ऐतिहासिक संदर्भ म्हणजे काय, हे नीटपणे लक्षात घेतले पाहिजे. ग्रामीण साहित्याला अवैदिक परंपरेची आणि लोकसाहित्याची जी संमृद्ध परंपरा आहे त्याचा संदर्भ ऱा. ग. जाधव या ठिकाणी ऐतिहासिकतेच्या संदर्भात घेत आहेत हे लक्षात येते. हा संदर्भ लक्षात घेतला तर स्वातंत्र्योत्तर काळात आंबेडकरी चळवळीतून जी जागृती दलित वर्गात आणि एकूण ग्रामीण परिसरात झाली त्याचा संदर्भ या ठिकाणी घेता येतो. यातून येणारे जे ग्रामीण 'सर्जनशील भान' आहे ते निश्चितच वेगळे असणार आहे कारण त्या साहित्याचे निर्मितीमूल्यच बदलले आहे. हा सगळा संदर्भ लक्षात घेता त्यांची ही व्याख्या किती महत्त्वाची आहे हे समजते. हे सर्जनशीलतेचे भानच ग्रामीणतेचे वेगळेपण अधोरेखित करणारे आहे. व्यापक मराठी साहित्याचे अंग असूनही ग्रामीणतेचे वेगळेपण कशात आहे, याचे उत्तर रा.ग. जाधवांच्या या व्याख्येतून आपणाला मिळते. ग्रामीण कादंबरी संदर्भात डॉ. किशोर सानप यांनी केलेली व्याख्याही महत्त्वाची आहे ते म्हणतात, "ग्रामीण कादंबरीत अपरिहार्यपणे ग्रामीणतेचे आशयिक मूल्य सर्व सामाजिक संदर्भांसह यावे लागते. तिच खरी ग्रामीण कादंबरीची ओळख असते. ग्रामीणता आपल्या अस्सल अशा भाषिक उमेदीसह कादंबरीत साकार होत असते. ग्रामीणता हे आशयिक मूल्य ग्रामीण भाषेच्या सूक्ष्म छटांसह अभिव्यक्तीच्या तंत्रांचा ग्रामीणतेचा संदर्भ देत कादंबरीचा अवकाश भरून काढत असते. ग्रामीण हे विशेषणही ग्रामीणतेच्या आशयिक मूल्याच्या अभिव्यक्तीनेच सिद्ध होत असते.[26] ग्रामीणतेकडे एक आशयिक मूल्य म्हणून ते पाहतात हे महत्त्वाचे आहे. अर्थात आनंद यादव यांच्यापासून वर उल्लेख केलेल्या बहुतेक सर्व अभ्यासकांनी ग्रामीण साहित्याचा 'आशयिक मूल्या'च्या संदर्भातच विचार केला आहे. तसेच त्यांनी ग्रामीण साहित्याच्या संदर्भात भाषिक उपयोजनेचे जे महत्त्व अधोरेखित केले आहे ते तेवढेच महत्त्वाचे आहे. प्रमाण भाषेतून साहित्य निर्मिती करण्याच्या दडपणातून अनेक ग्रामीण साहित्यिकांच्या साहित्यनिर्मितीवर मर्यादा आल्या असा एक विचार जो व्यक्त केला जातो त्याचा संदर्भ या ठिकाणी लक्षात घेता येतो. 'ग्रामीण साहित्यांने अस्सल अभिव्यक्ती साठी बोली भाषेचा केलेला स्वीकार' हे म्हणूनच ग्रामीण साहित्याचे एक महत्त्वाचे लक्षण ठरते. ग्रामीण साहित्य किंवा ग्रामीण कादंबरी याची एकच एक व्याख्या करता येणे शक्य नसले तरी एकूण ग्रामीण साहित्य किंवा ग्रामीण कादंबरी या संदर्भात विचार करताना वर उल्लेख केलेल्या सर्व गोष्टी लक्षात ठेवूनच 'ग्रामीण साहित्य' या संदर्भातील ऊहापोह करावा लागेल हे निश्चित! ग्रामीण या संज्ञेच्या अधिक सखोलतेने

विचार करताना आनंद यादव यांनी या संदर्भात केलेले विवेचन महत्त्वाचे आहे ते म्हणतात, "अनुभवांची घटकसाधने पात्रे, प्रसंग, घटना, निसर्ग इ. ग्रामीण जीवनातली असली तरी ते ग्रामीण साहित्य असू शकेल असे नाही. उदा- खानोलकरांची 'सनई' ही कथा. उलट बरीच घटक साधने नागर जीवनातील असूनही ते साहित्य ग्रामीण असू शकते उदा- अनिल अवचट यांचे 'माणसं' मधील लेख. ही सर्व घटक-साधने ज्या साध्यासाठी एकत्र येऊन कार्यप्रवण झालेली असतात ती 'हेतुकल्पना' ग्रामीण असणे आवश्यक आहे. 'हेतुकल्पना' ग्रामीण नसेल तर 'घटक साधने' ग्रामीण असूनही ते साहित्य ग्रामीणतेस पात्र होऊ शकत नाही. निर्मितीच्या अंगाने विचार करता 'हेतुकल्पना' हा साहित्यकृतीचा आत्मा असतो. घटकसाधनांनी निर्माण होते ते आत्म्याला मूर्तरूपात आणणारे शरीर."[27] वरील विवेचनांतून साहित्याची हेतुकल्पना म्हणजेच मूळ विचार कोणता, कोणता विचार घेऊन साहित्य लिहिले जाते ते महत्त्वाचे आहे. हे सांगायचे आहे. मूळ संवेदना ग्रामीण असेल तर बाहेरील परिवेष कसाही असला तरी त्या साहित्याला ग्रामीण म्हणता येईल. या अनुषंगाने हेतुकल्पना ग्रामीण असेल तर ते साहित्य ग्रामीण ठरते, असे म्हणता येते आणि असे असेल तर वि. स. खांडेकरासारख्यांनी ज्या ग्रामीण पार्श्वभूमीच्या कादंबऱ्या लिहिल्या त्यांना ग्रामीण कादंबऱ्या म्हणताच येणार नाही. वरील सर्व व्याख्या लक्षात घेता ग्रामीण साहित्य वा ग्रामीण कादंबरी संबंधी खालील प्रकारे काही निरीक्षणे नोंदविता येतात.

1) ग्रामीण कादंबरी पाश्चात्त्य संस्कृतीच्या अभ्यासाने प्रेरित झालेल्या आधुनिक मराठी साहित्याचाच एक भाग असली तरी, स्वातंत्र्योत्तर काळात तिला देशी परिमाणे प्राप्त झाली आहेत.
2) पांढरपेशा जीवन जाणिवांतील तोचतोचपणा टाळून नव्या वास्तवाभिमूख, देशीवादी जीवनजाणिवांचेचे चित्रण करण्याच्या प्रेरणेतून स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण कादंबरीची निर्मिती झाली आहे.
3) कृषिकेंद्रित जीवन हा ग्रामीण कादंबरीचा केंद्रबिंदू असून कृषी आणि कृषीच्या आधारे निर्माण झालेल्या सर्व व्यवस्था या सर्वांचे चित्रण ग्रामीण कादंबरीतून येते.
4) १९६० नंतरच्या काळात खेड्यापाड्यातील बहुजन समाजाचे जे आत्मभान जागृत झाले त्या प्रेरणेतून आधुनिक ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली आहे.
5) ग्रामीण साहित्य हे निसर्ग, प्रादेशिकता, आणि भौगोलिकता यांच्याशी अत्यंत जिव्हाळयाचे नाते सांगणारे असे साहित्य आहे.
6) ग्रामीण कादंबरी ही प्रामुख्याने भूक, दारिद्र्य अज्ञान, शोषण आणि उपेक्षा या गोष्टींचे चित्रण करणारी कादंबरी आहे.

7) ग्रामीण माणसाची एक वैशिष्ट्यपूर्ण अशी ग्रामीण मानसिकता असते ही ग्रामीण मानसिकता ज्या कादंबऱ्यांमधून व्यक्त होते त्या ग्रामीण कादंबऱ्या.

8) ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीमागे ऐतिहासिक संदर्भ आहे आणि हा ऐतिहासिक संदर्भ एकूण ग्रामीण साहित्याच्या आणि ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीस कारणीभूत ठरला आहे.

9) ग्रामीणतेचे 'सर्जनशील भान' व्यक्त करते ती ग्रामीण कादंबरी. हे सर्जनशील भान कादंबरीचा आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही माध्यमांतून व्यक्त होत असते.

10) ग्रामीण हे केवळ एक विशेषण नाही तर ते एक आशयिक मूल्य आहे. हे आशयिक मूल्य त्याच्या सर्व सामाजिक, सांस्कृतिक संदर्भासह साहित्यातून प्रकटते तेव्हा खऱ्या ग्रामीण कादंबरीची निर्मिती होते.

**1.6 ग्रामीण साहित्य व लोकसाहित्य**

ग्रामीण साहित्यासंबंधी विविध अभ्यासकांनी केलेल्या वरील सर्व व्याख्यांचा विचार केला व ग्रामीण कादंबरी म्हणून जी कादंबरी सांगितली जाते त्या कादंबरीची सर्व वैशिष्ट्ये लक्षात घेतली तर कादंबरीची एक स्वतंत्र आणि परिपूर्ण अशी व्याख्या करता येईल का? हा प्रश्न निर्माण होतो. या सर्व व्याख्यांचा विचार करता ग्रामीण साहित्याचा किंवा ग्रामीण कादंबरीचा अभ्यासाकरताना ग्रामीण साहित्याचा लोकसाहित्याशी असलेला ऋणानुबंध तेवढ्या विश्लेषकपणे कोणी लक्षात घेतलेला नाही हे जाणवते. ग्रामीण संस्कृती ही कृषी संस्कृती असली तरी मानवी संस्कृतीच्या विकासाच्या एका टप्प्यावर तो कृषक झाला आहे. अनेक लोकसमूह जे या भूमित आले त्यांच्यातील संघर्ष व सहकार्य यामधून या ठिकाणची लोकसंकृती आकाराला आल्याचे दिसते. त्यामुळे ग्रामीण जीवनावर लोकसंस्कृतीचा खूप मोठा प्रभाव आहे. साहाजिकच, एकूणच ग्रामीण साहित्याच्या जडणघडणीत लोकसाहित्याचा प्रभाव असणे अपरिहार्य आहे परंतु मोजके काही अपवाद वगळता या विषयाला ग्रामीण साहित्याच्या अभ्यासकांनी जास्त महत्त्व दिल्याचे दिसत नाही. ज्या काही मोजक्या अभ्यासकांनी या संदर्भात मांडणी केली आहे त्यातील एक म्हणजे डॉ. भाऊसाहेब गव्हाणे, ते आपल्या विवेचनात म्हणतात, “ग्रामीण साहित्याता मूळ प्रवाह लोकसाहित्याचा आहे. ग्रामीण साहित्यामध्ये लोकमानस, लोकत्त्व प्रकट होणे ही अपरिहार्य गोष्ट ठरते. ग्रामीण लोकत्त्वाची दृष्टी ही श्रद्धेची असते.”[28] पण इतर अभ्यासकांनी म्हणावे तेवढे महत्त्व या गोष्टीला दिले नाही. ग्रामीण साहित्यात देशीवादी जाणिवा प्रबळ होण्यास ही लोकसाहित्याची पार्श्वभूमी महत्त्वाची आहे. म्हणूनच, ग्रामीणहित्याची व्याख्या करताना या ग्रामीण जीवनातील लोकतत्त्वाचा व्याख्येत समावेश करणे आवश्यक वाटते.

**1.7 मी केलेली ग्रामीण कादंबरीची व्याख्या**

वरील सर्व व्याख्यांचा विचार केल्यानंतर अनेकांनी आपापल्या दृष्टिकोनांतून ग्रामीण साहित्याची किंवा ग्रामीण कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसते. मी नव्वदोत्तर कादंबरीचा अभ्यास या प्रबंधात करीत असल्याने ग्रामीणते संबंधातील अभ्यासात आलेले विविध घटक व इतरांनी केलेल्या व्याख्या लक्षात घेऊन ग्रामीण कादंबरी संदर्भातील माझे मत व्याख्येच्या स्वरूपात या ठिकाणी मांडीत आहे. "ग्रामीण सर्जनशीलतेतून कृषिकेंद्रीत अर्थव्यवस्थेशी निगडीत असलेल्या सर्व घटकांचे दर्शन ज्यामधून घडते, ज्यामधून ग्रामीण निसर्ग, प्रादेशिक वैशिष्ट्ये आणि भौगोलिकता यांचे भान राखले जाते. जी लोकसंस्कृतीशी नाते सांगताना लोकतत्वांच्या पारंपरिक जाणीवेतून निर्तीच्या प्रेरणा शोधते आणि त्यामुळेच जिला देशीवादी जाणिवा अधिक आपल्या वाटतात व या जाणिवा जिच्यातून समग्रपणे व्यक्त होतात, जी ग्रामीण परिसरासोबतच तेथील माणसे आणि त्यांची मानसिक जडणघडण यांचा सम्यकपणे आढावा घेते ती 'ग्रामीण कादंबरी' असे म्हणता येते."

अर्थात यातील प्रत्येक घटक प्रत्येक कादंबरीत असेलच असे सांगता येत नाही पण एकूण ग्रामीण कादंबरीचा आवाका या व्याखेतून लक्षात येऊ शकतो.

**1.8 ग्रामीण साहित्याच्या प्रेरणाः**

विविध व्याख्यांचा विचार केल्यानंतर ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा काय आहेत, यांचा विचार देखील आवश्यक ठरतो. ग्रामीण साहित्याच्या प्रेरणांचा विचार करतानाच त्या अगोदर ग्रामीण वास्तवाचे स्वरूप काय आहे? याचाही थोडासा ऊहापोह करणे आवश्यक आहे. यासंदर्भात डॉक्टर नागनाथ कोत्तापल्ले यांनी केलेले विश्लेषण लक्षात घेण्यासारखे आहे ते म्हणतात, "ग्रामीण व्यक्तीवर तीन घटक दबाव टाकत असतात एक कुटुंबाच्या परंपरा, दोन जातीच्या परंपरा आणि तिसरे म्हणजे गावगाड्याची बांधणी. या सगळयांमधून त्याची मनोरचना संपूर्णतः वेगळी अशी तयार होते. पुन्हा हे सगळेच कृषी संस्कृतीतून आलेले, म्हणजे निसर्गसन्मुख. त्यामुळे ग्रामीण माणूस आदिम मनोवस्था बाळगून असतो हेही दिसते. या सगळ्या घटकांमधून 'ग्रामसंस्कृती' निर्माण होत जाते. या संस्कृतीचे आणखी विविध घटक दाखविता येतील उदाहरणार्थ जत्राखेत्रा, लोकप्रकटनसंस्था इत्यादी. या सर्व प्रक्रियेतून गेलेल्या माणसाचे, माणसाच्या मनोविश्वाचे आणि व्यवहाराचे चित्रण करणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य. यातून ग्रामीण वास्तव प्रकट होते. हे सगळे होत असताना माणसाचे 'माणूसपण' प्रकट होतेच. माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म प्रकट होतातच. म्हणजे ग्रामीण साहित्य दोन स्तरांवर प्रचिती देते

एक स्तर: शेती, निसर्ग, त्यातून निर्माण झालेले समाजरचनेचे वेगळेपण, वेगळी जीवनपद्धती, या सगळ्यांपासून घडत गेलेले तेथील 'लोकमानस' म्हणजे मनोरचना.

दुसरा स्तर: माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म. हे उपरोक्त दोन्ही स्तर एकमेकांवरती परिणाम करीत असतात, हे उघड आहे. म्हणून एकूण ग्रामीण साहित्याचे आकलन करावयाचे झाल्यास, पहिल्या स्तराचे स्वरूप नीट समजावून घेणे आवश्यक असते. किंबहुना ते समजावून घेतले नाही तर ग्रामीण साहित्य कळणारच नाही."[29] नागनाथ कोत्तापल्ले यांनी या विश्लेषणातून जे मुद्दे मांडले आहेत ते एकूण ग्रामीण मानसिकता समजून घेण्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा काय आहेत? याचा विचार करताना, ग्रामीण मानसिकतेचा विचार आपणाला करावाच लागतो. ग्रामीण मामसिकतेचा विचार न करता आपणाला ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा समजून घेता येणार नाहीत. ग्रामीण माणूस आपल्या कौटुंबिक परंपरा, जातीय परंपरा आणि गावागाड्याशी बांधलेला असतो हे लक्षात घेते, त्याचप्रमाणे शेतीनिष्ठ अशा संस्कृतीतून तो लहानाचा मोठा होत असल्यामुळे तो निसर्गसन्मुख असतो आणि म्हणूनच आदिम अवस्था तो बाळगून असतो. त्याच्या साहित्याच्या प्रेरणा या मध्यवर्ती पांढरपेशा साहित्याच्या प्रेरणांपेक्षा निश्चितपणे वेगळ्या असतात. आजपर्यंतचे मराठी साहित्य ज्या पांढरपेशा संस्कृतीतून जन्माला आले आहे त्यापेक्षा ग्रामीण वास्तव आणि ग्रामीण माणसाची जडणघडण ही वेगळ्या धर्तीवर होत असल्याने ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा या मुख्य धारेतील साहित्य प्रेरणांपेक्षा निश्चितच वेगळ्या ठरतात. या वेगळेपणाचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असताना, आणखी एका गोष्टीची विशेषत्त्वाने नोंद करता येते. ज्यांचा ऊहापोह पुढे केला आहे.

### 1.8.1 लोकसाहित्याची प्रेरणा

वर उल्लेख केल्याप्रमाणे ग्रामसंस्कृतीचा लोकलंस्कृतीशी असलेला संबंध महत्त्वाचा असून, लोकसाहित्याची जी खूप मोठी परंपरा आपणाला लाभली आहे त्याचा थेट संबंध ग्रामीण माणसाच्या एकूण जडणघडण आणि त्याची साहित्यनिर्मिती यावर होत असतो, त्यामुळेच लोकसाहित्याची संमृद्ध परंपरा ही ग्रामीण साहित्याच्या निर्णितीमागची काहीशी सुप्त पण महत्त्वाची प्रेरणा आहे. ग्रामीण संस्कृती हा शब्दच लोकसंस्कृतीला समांतर असा शब्द आहे याची या ठिकाणी नोंद घेतले पाहिजे. या लोकसंस्कृतीत विविध कलांचे अनेक रूपबंध अस्तित्त्वात आहेत जे आजपर्यंत लोककलाकारांना नवनिर्मिती करण्यासाठी देखील प्रेरणादायी ठरले आहेत. लोकसाहित्याची ही संमृद्ध परंपरा ग्रामीण माणसाला वारशांनेच मिळत असल्याने जेव्हा तो कादंबरी सदृश लेखन

करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला या लोकसाहित्याचे जे संचित त्याच्यासाठी उपलब्ध असते त्यातून त्याला निश्चितच प्रेरणा मिळते.

**1.8.2 म. जोतिबा फुले यांची प्रेरणा:**

साधारणतः 1925 नंतर ग्रामीण साहित्य खऱ्या अर्थाने आकाराला येऊ लागले. अर्थात, त्याची मुहूर्तमेढ ही बऱ्याच अगोदर महात्मा फुले यांच्या काळात रोवली गेली होती. महात्मा फुले हे मराठी ग्रामीण साहित्याचे पहिले उद्गाते आहेत. शहरात राहणारा मध्यमवर्गीय पांढरपेशा समाज म्हणजेच फक्त मराठी समाज नव्हे, हा देश खेड्यांचा देश असून या देशातील बहुसंख्य जनता ही खेड्यातून, रानावनातून राहते. येथील लोकांचे प्रश्न, त्यांच्या समस्या या शहरी मध्यमवर्गीय, पांढरपेशी, उच्चवर्णीयांपेक्षा वेगळया आहेत याची जाणीव सर्वप्रथम म.फुल्यांनी आपल्या लेखनांतून करून दिली. या ग्रामीण भागातील लोकांचे जीवन अत्यंत कष्टाचे व दुःखमय आहे. तसेच, ते अभावग्रस्तांचे जीवन जगत आहेत आणि त्यांच्या नकळतपणे  त्यांचे मोठ्याप्रमाणात शोषण देखील होत आहे या सर्वांकडे महात्मा फुले यांनी सर्वात अगोदर सर्वांचे लक्ष वेधले. ग्रामीण जीवनाच्या केंद्रस्थानी शेतकरी आहे आणि शेती हा ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय आहे. या व्यवसायाला जोडून इतरही अनेक व्यवसाय ग्रामीण भागात उभे आहेत. ग्रामीण भागातील संपूर्ण अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून असते त्यामुळे पीक-पाणी कसे येईल, यावरच एकूण ग्रामीण जीवन अवलंबून असते. पीक चांगले आले तर आबादीआबाद पण ते आले नाही तर जगावे कसा हा प्रश्न! या ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी समाजाचे भटजी-शेटजींकडून शेतकऱ्यांच्या ठिकाणी असलेलल्या अज्ञान, दारिद्र्यामुळे कशाप्रकारचे शोषण होते हे सर्व प्रथम आपल्या साहित्यातून महात्मा फुले यांनी दाखवून दिले.  ‘शेतकऱ्यांचा आसूड’ या ग्रंथामधून त्यांनी शेतकऱ्यांचे शोषण कसे होते हे दाखवताना कर्जदार शेतकऱ्यांचे शोषण दाखवले असून कर्जबाजारीपणामुळे त्याची घरची स्थिती कशी होते हे देखील दाखवले आहे. एकूणच कृषिसंस्कृती आणि शेतीविषयक समस्यांचा ऊहापोह त्यांनी आपल्या साहित्यातून केला आहे. ‘तृतीय रत्न’ या नाटकामध्ये त्यांनी ढोंगी लोकांचे कटकारस्थान उघडे पाडून अंधश्रद्धेमुळे शेतकऱ्यांचे कसे नुकसान होते हे दाखवले आहे. म. फुल्यांनी जी बहुसंस्कृती वादाची आणि परिवर्तनाची भूमिका घेतली त्यामुळे ग्रामीण साहित्यात किंवा ग्रामीण जनमानसामध्ये एक नवीन ऊर्जा निर्माण झाली आणि ती ग्रामीण साहित्याच्या निर्मितीस प्रेरक ठरली असे म्हणता येते.

### 1.8.3 म. गांधी यांची प्रेरणा

1920 च्या दरम्यान काँग्रेसचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्या हाती गेले. त्यांनी 'गावाकडे चला' हा नारा दिला. हा नारा आपल्या ग्रामीण जीवनाबद्दलच्या दृष्टिकोनात आमूलाग्र परिवर्तन करणारा ठरला. ग्रामीण भागाकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन यामुळे बदलला आणि त्यामुळे, गांधीवाद ही ग्रामीण साहित्याची एक महत्त्वाची प्रेरणा आहे असे म्हणता येते. नागनाथ कोत्तापल्ले यांनी देखील ही ग्रामीण साहित्याची एक प्रेरणा म्हणून मान्य केली आहे ते म्हणतात, "1925 च्या दरम्यान उदयाला आलेल्या ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा एकूण मराठी साहित्यापेक्षा जरूर वेगळे आहेत. गांधीवादाचा परिणाम या कालखंडातील ग्रामीण साहित्यावर आहे, किंबहुना गांधीवाद ही ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे. असा परिणाम इतर मराठी साहित्यावर दिसत नाही. म्हणजे या काळातील ग्रामीण साहित्याची प्रेरणा गांधीवादी आहे."[30] अर्थात, गाधीजींच्या 'खेड्याकडे चला' या घोषणेतून ज्यांनी ग्रामीण भागाचे वर्णन केले त्यातील अनेकांचे वर्णन कृतक आणि वास्तवापासून कोसो दूर असल्याचे दिसते. उदा- खांडेकरांच्या कादंबऱ्या. पण गांधीचींचा एकूण दृष्टिकोन हा ग्रामकेंद्रीत होता आणि स्वयंपूर्ण खेड्याची त्यांची कल्पना अत्यंत क्रांतीकारी आणि सम्यक विकासाची दिशा देणारी होती हे निश्चित! पण खऱ्या अर्थाने गांधीजींचा ग्रामकेद्रीत दृष्टिकोन साहित्यातून व्यक्त होऊ शकला नाही परंतु गांधीजींची समग्र चळवळ ही एकूणच राष्ट्रीय उत्थानाला प्रेरक होती तशी ती ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला ही प्रेरक ठरली असे म्हणता येते.

### 1.8.4 डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा:

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य विशेषत्त्वाने लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी फक्त दलित समाजातच जागृती केले असे नाही तर एकूण ग्रामीण समाजासाठी त्यांचे विचार प्रेरणादायी ठरले आहेत. तसेच, व्यापक परिप्रेक्ष्यात दलित साहित्याचाही ग्रामीण साहित्य म्हणून विचार करणे आवश्यक ठरते. ग्रामीण जीवनात आणि ग्रामीण मानसिकतेत आमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व त्याचे विचार महत्त्वपूर्ण ठरले आहेत म्हणूनच, आंबेडकरांच्या सर्वांगीण परिवर्तनाच्या चळवळीकडे ग्रामीण साहित्य निर्मितीची महत्त्वाची प्रेरणा म्हणून पहावेच लागते.

### 1.8.5 सामाजिक चळवळींच्या प्रेरणा

ग्रामीण साहित्याच्या प्रेरणांबद्दल आणखी एक मुद्दा लक्षात घेतला पोहिजे आणि तो आहे सामाजिक चळवळींचा! आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत वेळोवेळी ज्या सामाजिक चळवळी निर्माण झाल्या त्या

खूपच महत्त्वाच्या आहेत. मा. जोतिबा फुले यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले 'सत्यशोधक जलसे' त्याचप्रमाणे शाहू महाराजांनी जी परिवर्तनवादी चळवळ सुरू केली त्याचाही परिणाम ग्रामीण साहित्यावर झाला. नंतरच्या काळात शरद जोशींनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारले ती देखील ग्रामीण साहित्याच्या निर्मितीमागील मोठी प्रेरणा ठरली. विशेषतः 'बारोमास', 'चिखलवाटा', 'साखरफेरा' अशा अनेक नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांतून या आंदोलनाचे संदर्भ येताना दिसतात. काळाच्या विविध टप्प्यावर निर्माण झालेल्या अशा अनेक चळवळी ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला प्रेरक ठरल्या आहेत आणि म्हणूनच मुख्यधारेतील मराठी साहित्यच्या प्रेरणांपेक्षा ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा या वेगळया आहेत. त्या म.फुल्यांच्या लेखनातून व सामाजिक कार्यातून, गांधीवादातून आणि शाहू महाराजांच्या प्रेरणेंतून तसेच ज्या सामाजिक चळवळी निर्माण झाल्या त्या मधून निर्माण झाल्या आहेत. या सामाजिक चळवळींचा विचार करताना शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या शेतकरी संघटनेच्या चळवळाचा मुद्दमहून उल्लेख करावा लागतो.

**1.8.6 मनोरंजनाची प्रेरणा:**

बाकी प्रेरणांचा विचार करीत असतानाच ग्रामीण साहित्याच्या निर्मितीमागे मनोरंजन ही देखील एक प्रेरणा आहे. अर्थात वास्तववादी प्रेरणा ही खरी ग्रामीण साहित्याची प्रेरणा आहे असे जरी आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे आदी अनेक अभ्यासकांनी मांडले असले व ते यथायोग्यच असले तरी, साधारणतः 1925 ते 1960 पर्यंत तरी मनोरंजन हे ग्रामीण साहित्याची एक प्रेरणा राहिली आहे. कदाचित ना. सी. फडके यांच्या कलावादातून आणि खांडेकर यांच्या कृतक जीवनवादातून ही मनोरंजनाची प्रेरणा अधिक दृढ होत गेली. वास्तववादी प्रेरणेंतून आपल्या लिखाणाला सुरूवात केलेले अनेक लेखक देखील या काळात मनोरंजनवादी भूमिका घेऊन लिहू लागले हे वास्तव आहे. 1960 नंतरच्या साहित्यातही आपणाला ही प्रेरणा दिसून येते. अर्थात, या प्रेरणेतून लेखन झाले ते ग्रामीण भागातील लोकांचे त्यांच्या प्रश्नांचे, समस्यांचे चित्रण करावे म्हणून नव्हे तर अनेकवेळा पार्श्वभूमी म्हणून किंवा काही विनोदी घटना-प्रसंगांची निर्मिती करण्यासाठी म्हणून ग्रामीण साहित्याचा आधार घेतला गेला असे दिसते. काही खेडूत पात्रांना अत्यंत भोळसट किंवा अत्यंत बेरकी अशाप्रकारे या साहित्यातून चित्रित केले गेले. गावरान शृंगाराचे दर्शन घडविण्यासाठी म्हणून देखील या ग्रामीण साहित्याची निर्मिती झाली असल्याचे दिसते. साहित्यातील भाषा देखील कमअस्सल आहे. ग्रामीण साहित्याच्या प्रेरणांचा विचार करीत असताना या मनोरंजनात्मक प्रेरणांचा विचार करावा लागत असला तरी एकूण ग्रामीण साहित्याचा विचार करता ती एवढी महत्त्वाची प्रेरणा नाही हे देखील लक्षात येते.

**1.8.7 वास्तववादी प्रेरणा:**

आनंद यादव यांनी विनायक टिकेकर (धनुर्धारी) यांची 1903 मध्ये लिहिलेली 'पिराजी पाटील' ही मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी असे म्हटले आहे. "पिराजी पाटील ही 'धनुर्धारी' (रामचंद्र विनायक टिकेकर) यांनी 1903 साली प्रसिद्ध केलेली पहिली मराठी कादंबरी मानावी लागते." [31] खरेतर, 1888 मध्ये कृष्णाराव भालेकर यांनी लिहिलेली 'बळीबा पाटील' ही मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून मानली पाहिजे असा आग्रह काही अभ्यासकांचा आहे. आनंद यादवांसारख्या अभ्यासकांनी मात्र 1903 हाच मराठी कादंबरीचा उगम म्हणून गृहीत धरले आहे. हा वाद बाजूला ठेवला तरी, विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून मराठी ग्रामीण साहित्याची परंपरा सुरू झाली असे म्हणता येते. या एकूण कालखंडाचा विचार केला असता, पहिल्या साठ वर्षांच्या काळात मराठी साहित्याच्या प्रेरणा या तत्कालीन इतर मराठी साहित्याप्रमाणे रंजनवादी आणि रीतिवादीच प्रेरणा राहिल्या आहेत. फक्त या साहित्याच्या पार्श्वभूमीमध्ये, भाषेमध्ये काही एक फरक आहे असे आपल्याला म्हणता येते. साठोत्तर कालखंडात मात्र ग्रामीण कादंबरीने वास्तववादाचे मूल्य स्वीकारल्याचे दिसून येते. आणि त्यामुळेच ग्रामीण परिस्थिती, ग्रामीण जीवन, ग्रामीण वास्तव यांचे अत्यंत सूक्ष्म आणि संवेदनशील चित्र आपणाला ग्रामीण कादंबऱ्यांमधून हळूहळू होऊ लागल्याचे दिसते. या संदर्भात उद्धव शेळके यांच्या 'धग' या कादंबरीचा मुद्दाम उल्लेख करावा लागेल. आनंद यादव, रा. रं. बोराडे यांनी ज्या ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या त्या खऱ्या अर्थाने ग्रामीण वास्तवाचे भान ठेवून लिहिल्या असे म्हणता येते. या कादंबऱ्यांमधून ग्रामीण संवेदनशीलता व्यक्त झाली आहे. साठोत्तरी काळातील कादंबऱ्यांतून अभिव्यक्तीच्या कक्षा अधिकाधिक रुंदावत गेल्या, ग्रामीण जीवन त्याच्या विविध कंगोऱ्यांसह त्यातून अभिव्यक्त होताना दिसते. प्रसिद्ध समीक्षक भालचंद्र नेमाडे यांनी या काळातील ग्रामीण कादंबऱ्यांची चर्चा करीत असताना या कादंबऱ्यांना 'स्थानप्रधान कादंबरी' असे म्हटले या संदर्भातील विश्लेषण करताना ते म्हणतात, "स्थान प्रधान कादंबरीने आपल्या मर्यादित क्षेत्रात वास्तवाचे जबरदस्त प्रांत उभारून मराठीतल्या पुण्या-मुंबईच्या एकांतिक रीतिप्रधान परंपरेला खुजे वाटायला लावले, दोन पिढ्या रुजलेल्या अवास्तव लैंगिक आशयाचे पितळ उघड करत आणले, गंभीर परिणाम दिले, जोरकस गावठी मराठी भाषा कादंबरी घुसून निवेदनाची अल्पशब्दकळा दिली, नवी तंत्रे रूढ केली, मराठी कादंबरीच्या विकासात या प्रवृत्तीला महत्त्वाचे स्थान आहे. तिने मराठी वास्तववादाचा रक्तक्षय संपवणारे देशी भान दिले.[32]

### 1.8.8 देशीवादी प्रेरणा:

नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीचा विचार करता 'देशीवाद' ही ग्रामीण कादंबरीच्या निर्मितिमागील एक महत्त्वाची प्रेरणा आहे असे निश्चितपणे म्हणता येते. 1980 च्या दरम्यान प्रसिद्ध लेखक व समीक्षक भालचंद्र नेमाडे यांनी देशीवादाची मांडणी करायला सुरूवात केली. ही संकल्पना देखील पाश्चात्त्य असली तरी बदल्या सामिजिक वास्तवामध्ये विशेषतः ग्रामीण भागातून जे नवोदित लेखक म्हणून पुढे येत होते त्यांच्यासाठी ही देशीवादी प्रेरणा आकर्षित करणारी ठरली. या संदर्भात डॉ. हरिश्चंद्र थोरात यांनी व्यक्त केलेले मत लक्षात घेण्यासारखे आहे ते म्हणतात, "भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या आसपासच्या काळात महाराष्ट्रीय समाजाच्या रचनेमध्ये काही महत्त्वाचे बदल होऊ लागले होते. तुलनात्मक दृष्टीने पाहता शिक्षणाचा प्रसार बऱ्यापैकी झाला होता. ग्रामीण भागातली, छोट्या गावांमधली, तालुका-जिल्हा या पातळ्यांवरील मोठ्या गावांमधली अठरापगड जाती-जमातींची मुले शिकू लागली होती. या शिकणाऱ्या नव्या मुलांमधून नोकरदार असा नवा वर्ग निर्माण होऊ लागला होता. हा वर्ग महत्त्वाकांक्षी होता. लोकशाहीतील निवडणुकांच्या राजकारणाने त्याला आपल्या सामर्थ्याचाही प्रत्यय येऊ लागला होता. केवळ राजकीयच नव्हे तर सांस्कृतिक वर्चस्वही त्याला हवे होते. राजकीय वर्चस्वाच्या संदर्भात जातिपातीचे हिशेब महत्त्वाचे ठरतात, याची जाणीव त्याला होऊ लागली होती. या जाणिवेतून पारंपरिक अस्मितेच्या पुनर्बांधणीचे कार्य या शिकल्या- सवरल्या मुलांनी हाती घेतले होते. साहित्याच्या संदर्भात पाहू गेल्यास या नव्या वर्गाला अग्रक्रम देणारे नवे निकष निर्माण होणे आवश्यक होते. ज्यामधून या नव्या मध्यमवर्गाचे अस्मिताभान प्रकट होईल, असे साहित्य निर्माण होणे आवश्यक होते. हे कार्य पार पाडण्याचा प्रयत्न काही प्रमाणात ग्रामीण साहित्यांने केला. तो विशेष प्रभावी ठरला नाही, याचे कारण ग्रामीण साहित्य हा एक सवतासुभा ठरला. कोठलाही एखादा सवतासुभा साहित्यसंस्कृतीच्या केंद्रस्थानी येणे शक्य नव्हते. या नव्या मध्यमवर्गाच्या आशा-आकांक्षांनी एकात्म केलेला, पण विशिष्ट प्रदेश, समाजाचे विशिष्ट अंग ओलांडून व्यापक झाला आहे, असे वाटणारा नवा मूल्यव्यूह निर्माण करणे ही या वर्गाची गरज होती. ती भालचंद्र नेमाडे यांनी पूर्ण केली. नवनैतिकता आणि देशीवाद यांच्यामधून नेमाडे यांनी या वर्गाला आचरणसुलभ असे नीतिशास्त्र दिले, तर वास्तववादामधून आचरणसुलभ असे सौंदर्यशास्त्र दिले. नव्याने निर्माण झालेल्या या वर्गाच्या महत्त्वाच्या गरजा नेमाडे यांनी पूर्ण केल्यामुळे या वर्गाचे सांस्कृतिक नायकत्व त्यांच्याकडे आपोआपच चालून आले. या सर्व प्रक्रियेमधून मराठी कादंबरीचे फारसे भले झाले असावे असे वाटत नाही. स्वतः नेमाडे

यांनाही या गोष्टीची जाणीव झाली असावी असे वाटते. अलीकडे अनेकदा समकालीन मराठी कादंबरीबद्दलचे आपले असमाधान ते व्यक्त करताना दिसत आहेत.” [33]

यामधून फारसे काही साध्य झाले नाही असे हरिश्चंद्र थोरात म्हणत असले तरी लिहिण्यासाठीची एक नवी प्रेरणा मराठी ग्रामीण कादंबरीकारांना मिळाली हे नाकारता येणार नाही.

**1.9. ग्रामीण संवेदनशीलता.**

1975 नंतरच्या काळात ग्रामीण भागातील सुशिक्षितांची नवी पिढी उदयाला आली आणि त्यांनी ग्रामीण साहित्याचे दालन अधिक समृद्ध केले. दलित, आदिवासी, बहुजन अशा अनेक स्तरावरील लेखकांच्या ग्रामीण संवेदना अधिक सखोलपणे साहित्यातून व्यक्त झाल्या. अर्थात; दलित, आदिवासी हे साहित्याचे आपण वेगळे प्रकार मानत असलो तरी ग्रामीण संवेदनेचा विचार करता या साहित्याचा अभ्यासही ग्रामीण म्हणून करता येतो. या सर्वाचा विचार करता, साठोत्तरी काळात ग्रामीण कादंबरी हे अधिक समृद्ध आणि विकसनशील झाली असे दिसून येते. यासंदर्भात; आनंद यादव यांचे मत लक्षात घेतले पाहिजे ते म्हणतात, "ग्रामीणता हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग मानावा लागतो. ग्रामीण जीवन समजून घेऊन त्या जीवनाच्या अंगाने स्वतः त्याविषयीचे आकलन मांडणे, त्या अंगानेच अनुभवाचे आकार शोधणे, अनुभवांची मांडणी करणे हेच ध्येय समजून जेव्हा साहित्यनिर्मिती होते, तेव्हाच तिच्यात ग्रामीणतेचे रंग उतरू लागतात."[34] हे विश्लेषण लक्षात घेता साठोत्तरी कालखंडात ग्रामीण परिसरातून लहानाचा मोठा झालेला असा लेखक हा ग्रामीण साहित्याचा निर्माता आहे हे आपल्या लक्षात येते. नोकरी-व्यवसायासाठी तो जरी शहराच्या ठिकाणी स्थायिक होत असला तरी त्याची ग्रामीण संवेदना ही कायम राहिल्याचे दिसते. आनंद यादव, रा. रं.बोराडे, उद्धव शेळके अशी अनेक उदाहरणे या संदर्भात देता येतील. शहरापासून भिन्न असलेली ग्रामसंस्कृती तिथल्या अनेक वैशिष्ट्यांसह ग्रामीण साहित्यातून चित्रित होताना दिसते. शहरी संसकृतीचे ग्रामसंस्कृतीवर होणारे आक्रमण पचवत ही संस्कृती आपले वेगळेपण टिकवून ठेवताना साहित्यनिर्मिती करताना दिसते. असा वेगळा आशय घेऊन येणाऱ्या ग्रामीण कादंबरीची निर्मिती आणि तिचा आस्वाद हे मराठी कादंबरीविश्वाला प्राप्त झालेले नवे परिमाण आहे. तसेच, ते एकूण साहित्यिक संस्कृतीच्या जिवंतपणाचे उदाहरण आहे. कालानुरुप मराठी ग्रामीण कादंबऱ्यांच्या प्रेरणा बदलल्या आहेत व या बदलांमागे, राजकीय, सामाजिक, आर्थिक घटना कारणीभूत आहेत, तसेच साहित्याविषयीचे बदलते भान आणि साहित्यविषयक बदललेले दृष्टिकोन हे देखील प्रेरणांच्या स्वरूपात कार्यरत राहिले आहेत असे दिसते.

**1.10 ग्रामीण कादंबरीचे तत्त्वज्ञानः**

कादंबरीला तत्त्वज्ञान असते का, किंवा मराठी कादंबरीला असे काही तत्त्वज्ञान आहे का? अशा प्रकारचे प्रश्न मराठी कादंबरीच्या निर्मिती संदर्भात विचारता येण्यासारखे आहेत. ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करीत असताना ग्रामीण कादंबरीला स्तःचे असे काही तत्त्वज्ञान आहे का? याची चिकित्सा करणे हे देखील क्रमप्राप्त आहे. समाजाच्या स्वरूपाविषयीचे, समाजाच्या एकूण जडणघडणी विषयीचे प्रश्न जसे एखाद्या समाजशास्त्रज्ञाला पडतात तसेच ते एखाद्या कादंबरीकारालाही पडतात. लेखकाने आपल्या कादंबरी लेखनासाठी समाजाचाच आधार स्वीकारलेला असतो. या प्रश्नांची उत्तरे शोधीत असताना पृष्ठभागावर जे दिसते त्याच्या पलीकडे जाऊन बौद्धिक स्वरुपाची सुसंगत व विविध सामाजिक व्यवहारांची स्पष्टीकरणात्मक मांडणी एखादा कादंबरीकार करतो तेव्हा तो विशिष्ट व्यूह, विचारसरणी किंवा विशिष्ट तत्त्वज्ञान स्वीकारून आपले लेखन करतो असे म्हणता येते. द्रष्ट्या कादंबरीकाराकडून अशाप्रकारची मांडणीच अपेक्षित असते. समाजात वावरत असताना नेमके महत्त्व कशाला द्यायचे? अनेक वर्षांच्या परंपरेतून निर्माण झालेल्या व्यवस्थेला की कालानुरूप झालेले बदल पचवून नव्याने प्रस्थापित होऊ पहात असलेल्या परिवर्तनशील मूल्य व्यवस्थेला? अशा प्रकारचे प्रश्न संवेदनशील लेखकासमोर निर्माण होतातच, तेव्हा एक बाजू घेऊन किंवा समन्वयाची भूमिका घेऊन काही एक स्वतंत्र मांडणी आपल्या लेखनातून लेखक करतो तेव्हा ते त्याच्या कादंबरीचे तत्त्वज्ञान असते. अर्थात, एकूण कादंबरीचे म्हणून एकच तत्त्वज्ञान असते की लेखकानुसार प्रत्येक कादंबरीला वेगळे तत्त्वज्ञान असते? असा प्रश्नही निर्माण होतो. याचे उत्तर देताना आपण असे म्हणू शकतो की, काही सैद्धांतिक किंवा तत्त्वज्ञानात्मक व्यूह समाजात अस्तित्वात असतात. त्याला विचारांचे समूह ( School of Thoughts) असे म्हणतात. त्यामुळे या विचारांच्या अनुषंगाने व एका विशिष्ट स्वरूपाच्या लेखनात यातील कोणती विचारधारा जास्त प्रभावीपणे व्यक्त झाली आहे त्यानुसार त्या कादंबरीचे तत्त्वज्ञान काय आहे हे आपणाला सांगता येते. अर्थात, एखादा तेवढ्याच ताकदीचा कादंबरीकार एखाद्या नवीन तत्त्वज्ञानात्मक विचाराची मांडणी आपल्या लेखनातून करू शकतो हे ही नाकारता येत नाही. कादंबरीचा विचार करताना तिची सामाजिकता महत्त्वाची असते. ग्रामीणकादंबरीचा अभ्यास करताना ती अधिक महत्त्वाची ठरते कारण सामाजिकता हा ग्रामीण कादंबरीचा मुलभूत घटक आहे. समाज कसा असावा, समाजाची रचनाकशा प्रकारची असावी, या सामाजिक व्यवस्थेमध्ये प्रत्येकाला अर्थपूर्ण जगण्याचा अधिकार कशाप्रकारे मिळेल? अशा प्रकारच्या प्रश्नांची चर्चा कादंबरीच्या सामाजिक तत्त्वज्ञानासंदर्भात केली जाते. या संदर्भात ज्येष्ठ समीक्षक डॉ. हरिश्चंद्र थोरात यांनी व्यक्त केलेले मत लक्षात घेतले पाहिजे ते म्हणतात, ‘‘सामाजिक तत्त्वज्ञानाच्या

संदर्भात मराठी कादंबरी दुबळी आहे असे म्हणता येईल. असे निश्चित व जाणीवपूर्वक तत्त्वज्ञान हरीभाऊंकडे होते, म्हणून ते मोठे कादंबरीकार ठरले, असेही म्हणता येईल. श्री. व्यं. केतकर, वा. म. जोशी, विभावरी शिरूरकर किंवा नंतरचे मुक्तिबोध यांच्यासारख्या कादंबरीकारांमध्येही ते काही प्रमाणात होते, हा त्यांचा वेगळेपणा सांगता येईल. बहुतेकांना आपल्या सामाजिक तत्त्वज्ञानाची सुस्पष्टपणे जाणीवच नसते, असे म्हणता येईल. असे असले तरी समाजाविषयीच्या या जाणिवेमध्ये गेल्या काही वर्षात महत्त्वाची स्थित्यंतरे होत आली आहेत आणि अलिकच्या कादंबरीने चोखाळलेल्या नव्या वाटा सुस्पष्ट करताना या स्थित्यंतराचे स्वरूप पाहणे अगत्याचे आहे.” [35] काही मोजके अपवाद वगळता सामाजिक तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मराठी कादंबरी ही दुबळी आहे अशा प्रकारचे मत थोरात यांनी व्यक्त केले आहे. विशिष्ट तत्त्वज्ञान घेऊन मराठी कादंबरीचे लेखन न झाल्याने मराठी कादंबरी खूप मोठी उंची गाठू शकली नाही असेही त्यांना म्हणायचे असावे. अलीकडच्या कादंबरीत काही स्थित्यंतरे जाणवतात असे त्यांनी म्हटले आहे. ही अलिकडच्या काळातील स्थित्यंतरे ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात असावीत असे निश्चितपणे म्हणता येते. कारण, या संदर्भातील स्पष्टीकरण करताना त्यांनी आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला आहे ते म्हणतात, “कोसला नंतरच्या काळात नेमाडे यांची कादंबरी वास्तववादाकडे वळली. संदिग्धतेला, असंगतीला महत्त्व देणाऱ्या आधुनिकतावादाची संगत त्यांनी सोडून दिली. समीक्षेमध्येही त्यांनी वास्तववादाच्या मूल्ययुक्ततेचा जोरदार पुरस्कार केला. याशिवाय आपल्या समीक्षेमधून आणि मुलाखतीं मधून 1980 च्या दशकाच्या प्रारंभापासून देशीवादी भूमिका जोरदारपणे मांडण्यास त्यांनी प्रारंभ केला. देशीवादी भूमिकेमध्ये संस्कृतीच्या उदात्तीकरणाला, भूतकाळाच्या गुणगौरवाला, परंपरेच्या सामर्थ्याला महत्त्वाचे स्थान असते. देशीवाद आणि वास्तववाद यांची युती होऊन अस्मितांच्या राजकारणात उपयोगी पडणारे आणि वास्तवाच्या यथातथ्य चित्रणावर विसंबणारे कादंबरीचे नवे प्रारूप मराठी कादंबरीला सापडले. अलीकडच्या मराठी कादंबरीवर या प्रारूपाचा फार मोठा प्रभाव आहे. नेमाडे यांच्या वास्तववादाने व देशीवादाने महानगरी केंद्रापासून दूर असलेल्या नव्याने लिहू लागलेल्या लेखकांना सहज पचनी पडणारी आणि त्यांच्या परंपरेशी नाते असणारी दृष्टी दिली. मूल्यव्यवस्थेविषयीचा विधिनिषेध दिला. या एकूण वातावरणाबद्दल मी सतत चिकित्सक भूमिका घेत आलो असलो तरी मराठी कादंबरीला सापडलेली ही एक नवी वाट आहे याबाबत

शंका नाही.”[36] त्यांचे हे मत विचारात घेता व महानगरी केंद्रापासून दूर असलेल्या नव्याने लिहू लागलेल्या लेखकांबद्दल ते बोलत असल्याने ते ग्रामीण लेखकांबद्दलच बोलत आहेत हे निश्चित! याचा अर्थ; नेमांडेनी देशीवादाचे जे नवीन प्रारूप दिले आहे किंवा देशीवादी भूमिका स्वीकारून जे ग्रामीण लेखक लिहीत आहेत.

त्यांच्या बद्दलच थोरात लिहीत आहेत हे लक्षात येते. म्हणजेच, आधुनिक ग्रामीण मराठी कादंबरीची जडणघडण देशीवादी तत्त्वज्ञानाची बैठक स्वीकारून होत आहे असे त्यांना म्हणायचे आहे. या ठिकाणी आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. दलित चळवळीचे तत्त्वज्ञान जसे दलित साहित्याच्या निर्मितीला कारणीभूत ठरले तसे ग्रामीण साहित्या बाबत काही सांगता येते का? दलित साहित्याचा विचार करताना दलितांमध्ये आत्मजागृती निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या विचारांचे, मूल्यांचे प्रभावी चित्रण विद्रोह, नकार, नवनिर्मिती यांच्या उद्घोष करत दलित साहित्यातून झालेला दिसतो. म्हणजेच, एक विचार घेऊन, एक तत्त्वज्ञान घेऊन, त्याच्या आधारावर दलित साहित्य निर्माण झाले आणि सर्वांगीण अशा समाजपरिवर्तनाचे एक शस्त्र म्हणून दलित साहित्याचा उपयोग केला गेला. ग्रामीण साहित्याचा विचार करता अशा प्रकारचे कोणतेही तत्त्वज्ञान ग्रामीण साहित्याच्या निर्मितिमागे होते असे दिसून येत नाही. मूलतः दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य याची निर्मिती प्रक्रियाच सर्वस्वी भिन्न आहे. चणवळीतून साहित्य हा जो क्रम आपणाला दलित साहित्याबद्दल सांगता येतो तो आपणाला ग्रामीण साहित्याबद्दल सांगता येत नाही. ग्रामीण साहित्याची चळवळ ही ग्रामीण साहित्याच्या निर्मितिला सुरूवात झाल्यानंतर काही विशिष्ट उद्दष्टे डोळयासमोर ठेवून नंतरच्या काळात सुरू झाली आणि त्याचे तात्त्विक अधिष्ठान शोधण्याचा प्रयत्न बऱ्याच नंतरच्या काळात केला गेला. ग्रामीण कादंबरीच्या तत्त्वज्ञानाची अधिक चिकित्सा करण्याआधी ग्रामीणसाहित्य आणि ग्रामीण साहित्याची चळवळ यांचा ऊहापोह करणे देखील आवश्यकआहे कारण हा विषय ग्रामीण मराठी कादंबरीच्या तत्त्वज्ञानांशी जोडलेला आहे.

**1.11 ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण साहित्याची चळवळः**

1977 च्या सुमारास ग्रामीण साहित्याची चळवळ उदयाला आली. डॉ. आनंद यादव आणि त्यांच्या इतर काही सहकाऱ्यांच्या पुढाकारातून या ग्रामीण साहित्य चळवळीचा उदय झाला. ग्रामीण साहित्याला या चळवळीच्या माध्यमातून तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न देखील डॉ. आनंद यादव आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी केला. एकूण मराठी ग्रामीण साहित्याला एक वेगळी दिशा दाखवण्याचा प्रयत्न म्हणून ग्रामीण साहित्य चळवळीकडे बघितले जाते, किंबहुना ग्रामीण साहित्याला त्याचे स्वतःचे असे तत्त्वज्ञान आणि त्याची स्वतःची अशी विशिष्ट ओळख देण्याचा प्रयत्न ग्रामीण साहित्य चळवळीने केला आहे. या सगळयाचा विचार करता, ग्रामीण साहित्याचा अभ्यास करताना या निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्य चळवळीचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. एकूण मराठी साहित्यावर शहरी मध्यमवर्गाचा प्रभाव आहे. या शहरी मध्यमवर्गीय मानसिकतेतून जे साहित्य निर्माण होते त्यालाच मुख्यप्रवाहातील साहित्य म्हणून मान मिळतो आणि ग्रामीण पार्श्वभूमीवरचे

ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवणारे जे साहित्य निर्माण होते त्याला सापत्नभावाची वागणूक मिळते. ग्रामीण साहित्याची निर्मिती करणाऱ्या साहित्यकारांकडे देखील उपहासात्मकरित्या पाहिले जाते व त्याच्याकडे दुर्लक्ष केसे जाते. हा सगळा अनुभव लक्षात घेऊन, ग्रामीण साहित्याला त्याचे स्वतःचे व्यासपीठ मिळाले पाहिजे, ग्रामीण साहित्याला त्याची स्वतःची ओळख मिळाली पाहिजे आणि ग्रामीण साहित्याची सखोल समीक्षा झाली पाहिजे किंबहूना, ग्रामीण साहित्याचे स्वतःचे वेगळे सौंदर्यशास्त्र निर्माण झाले पाहिजे, आजही 70 टक्के समाज हा खेड्यात राहतो आणि असे असूनही त्याला अभिव्यक्तीची संधीच मिळत नाही आणि त्यांने ती केलीच तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाते, हे सगळे बदलायचे असेल, ग्रामीण साहित्याला मुख्यप्रवाहातील साहित्य म्हणून ओळख मिळायची असेल, तर ग्रामीण साहिच्याची चळवळ उभी राहिली पाहिजे, ग्रामीण साहित्याला स्वतःचे व्यासपीठ मिळाले पाहिचे, प्रत्येक टप्प्यावर ग्रामीण साहित्याची दखल घेतली गेली पाहिजे , ग्रामीण साहित्याला त्याचा मानसन्मान देखील मिळाला पाहिजे या हेतूने ग्रामीण साहित्य चळवळीला प्रारंभ झाला. 1970 नंतरच्या काळात महाराष्ट्राच्या विविध भागात ग्रामीण साहित्याची स्वतंत्र अशी आयोजित केली गेलेली संमेलने, लेखकांच्या कार्यशाळा, शिबिरे, मराठी ग्रामीण साहित्य यासंदर्भातील तात्त्विक विचार मांडणारे डॉ. आनंद यादव यांचे प्रकाशित झालेले ग्रंथ, ग्रामीण साहित्य परिषदेची अधिकृतरित्या झालेली स्थापना ,तसेच 1975 नंतरच्या काळात डॉ. आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, मदन कुलकर्णी, वासुदेव मुलाटे, रा. रं. बोराडे, द. ता. भोसले, भास्कर चंदनशिव, श्रीराम गुंदेकर अशा अनेक अभ्यासकांनी आपल्या वैचारिक आणि समीक्षात्मक संशोधन ग्रंथातील लेखनातून या प्रवाहाची केलेली तात्त्विक, वैचारिक मांडणी यातून ग्रामीण साहित्य चळवळ उभी राहिली. 1977 मध्ये पुणे येथे झालेला ‘तरूण ग्रामीण लेखकांचा मेळावा’ हा या चळवळीचा प्रारंभबिंदू म्हणून सांगता येतो. ही चळवळ उभारण्यामागील जी कारणे आनंद यादव यांनी सांगितली आहेत ती महत्त्वाची आहेत. ते म्हणतात, "पूर्वसूरी निर्माण केलेली ग्रामीण साहित्याची कोंडी फुटावी, दलित साहित्यांने निर्माण केलेल्या साधनतत्त्वातून मराठी साहित्य मुक्त व्हावे आणि ते समग्र मराठी जीवनाला सामोरे जावे स्वतःच्या देशीपरंपरांचा शोध त्यांने घ्यावा नवतरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचा सामाजिक, सांस्कृतिक अंगाने विकास व्हावा, त्याला सत्व शोधता यावे नव्या आधुनिक खेड्याला वाङ्मयाचा नवा वारसा मिळावा. खेड्यातले वाङ्मयीन वृत्ती-प्रवृत्तीचे अंकुर कोमेजू नयेत या खेड्यांना साहित्य जागरण व नवसंस्कृती-जागरण यांचा स्पर्श व्हावा म्हणून ही चळचळ सुरु झाली."[37]

डॉ. आनंद यादव यांचे हे प्रतिपादन लक्षात घेता, प्रस्थापित मराठी साहित्य व्यवस्थेकडून ग्रामीण साहित्य व ग्रामीण लेखकाची होणारी अनास्था, उपेक्षा याविषयीची प्रतिक्रिया व्यक्त करणे, मराठी ग्रामीण लेखकांच्या विविध अडचणी समजून घेणे व त्यांना मार्गदर्शन करणे इत्यादी उद्दिष्टे समोर ठेवून ग्रामीण साहित्य चळवळीला प्रारंभ झाला असे दिसते. आपण जेव्हा चळवळ असे म्हणतो तेव्हा त्या चळवळीला अत्यंत स्पष्ट असे सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक, परिवर्तनशील अशाप्रकारचे तात्त्विक अधिष्ठान असावे लागते. असे तात्त्विक अधिष्ठान नसेल तर कोणतीच चळवळ उभी राहू शकत नाही. ग्रामीण साहित्याची सैद्धान्तिक भूमिका मांडण्याचा प्रयत्न या ग्रामीण साहित्याच्या चळवळीद्वारे झाला आहे. चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण साहित्याला एक विधायक वळण लावणे, ग्रामीण साहित्याचे वैचारिक व्यवस्थापन करणे या गोष्टी ग्रामीण चळवळीच्या माध्यनातून साध्य करण्याचा प्रयत्न या चळवळीने केला आहे. ग्रामीण साहित्याचे तत्त्वज्ञान हे निश्चित करून त्यादृष्टीने कृतीची अपेक्षा या चळवळीला अभिप्रेत असल्याचे दिसते. तात्त्विक अधिष्ठानाशिवाय कोणतीही चळवळ जीवनाच्या किंवा साहित्याच्या क्षेत्रात उभी राहणे शक्य नाही. ग्रामीण साहित्याच्या चळवळीबद्दल देखील हेच म्हणता येते. ग्रामीण साहित्याच्या चळवळी संदर्भात चळवळीच्या प्रवर्तकांनी चळवळीची सैद्धान्तिक मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. या चळवळीचे तात्त्विक अधिष्ठान कोणते? ही चळवळ कोणत्या विचारांची बांधिलकी स्वीकारते? याबद्दलचा ऊहापोह अनेकांनी आपल्या विश्लेषणातून केला आहे. कोणत्या विचारांची बांधिलकी ही चळवळ स्वीकारते? याचे उत्तर देत असताना परिवर्तनवादी, शोषण विरोधी, जीवनवादी बांधिलकी स्वीकारते असे उत्तर सर्वांनीच दिले आहे. अर्थात एखाद्या विशिष्ट तत्त्वज्ञानाची बांधिलकी स्वीकारते का? याबाबतीत मात्र निश्चित अशी भूमिका या चळवळीच्या प्रवर्तकांनी घेतलेली नाही. यासंदर्भात या साहित्य चळवळीचे नेतृत्व स्वीकारलेल्या डॉ. आनंद यादव यांनी आपली या संदर्भातील भूमिका स्पष्ट करताना, “ग्रामीण साहित्य चळवळ ही महात्मा फुले यांच्या मानवतावादाचा, शूद्रातिशूद्रांवर व स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचा व त्यांच्या विकासाचा, छोटे शेतकरी, खंडकरी, कुळे, कुणबी, शेतमजूर, खेड्यातून नागरी विभागात पोटार्थी होऊन आलेले मजूर, कामगार, दलित व आदिवासी यांच्या होणाऱ्या शोषणाचा वारसा सांगते. या सर्वांच्या विकास-उद्धारार्थ काळाच्या ओघात ज्यांनी त्यांनी कार्य केले व विचार मांडले त्यांचा आणि त्यांच्या आवश्यक त्या विचारांचा वारसा सांगते. कुठल्याही एका व्यक्तीची किंवा विभूतीची ती पूजक नाही”.[38] असे म्हटले आहे. म. फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, कार्ल मार्क्स या परीवर्तनशील विचारवंतांचे विचार स्वीकारत असतानाच, काळाच्या ओघात नंतर किंवा अगोदरच्या काळातही एकूण ग्रामीण समाजाच्या अभ्युदयासाठी ज्यानी ज्यानी

विचार प्रकट केले त्यातील आवश्यक त्या सर्व विचारांचा स्वीकार ग्रामीण साहित्य चळवळीने केला आहे. तसेच ही चळवळ व्यक्तिनिष्ठ नसून ती विचारनिष्ठ आहे, त्यामुळेच जे विचार योग्य वाटतील, पचतील आणि चळवळीला पुढे नेणारे वाटतील ते सगळेच विचार या चळवळीने स्वीकारले आहेत. या चळवळीने व्यक्ती पूजेला महत्त्व दिले नाही तर सुधारणावादी, विकसनशील असे सगळेच विचार स्वीकारले आहेत. विशिष्ट तत्त्वज्ञानाची किंवा एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या तत्त्वज्ञानाची कास न धरता कोणतीही विशिष्ट वैचारिक चौकट ही चळवळ स्वीकारीत नाही. या संदर्भात नंतरच्या काळातील या चळवळीचे एक महत्त्वाचे भाष्यकार डॉ.वासुदेव मुलाटे यांनी यासंदर्भात व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, "मानवी महत्तावाढविणारे, सर्व परीच्या शोषणाविरुद्ध आवाज उठविणारे, दीनदुबळयांना बळ प्रदान करणारे, त्यांच्यात आत्मजागृती निर्माण करणारे विचार ग्रामीण साहित्याचे अधिष्ठान आहेत….. ग्रामीण साहित्याच्या चळवळीने महात्मा फुल्यांबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, वि.रा. शिंदे यांचे विचार स्वीकारले आहेत तसेच महात्मा गांधी, आगरकर, लोकहितवादी, लोकमान्य टिळक आणि सावरकर यांचे विचारही एका विशिष्ट मर्यादेपर्यंत वर्तमानातील वास्तवाच्या पातळीवर स्वीकारले आहेत." [39] वासुदेव मुलाटे यांनी केलेले हे प्रतिपादन या चळवळीची वैचारिक भूमिका किती सावध, जागरूक आहे त्याचे द्योतक मानता येईल. अर्थात यामधून ग्रामीण चळवळीला विशिष्ट असे कोणतेच तत्त्वज्ञान नाही, असाही अर्थ त्यामधून काढता येईल. डॉ.आनंद यादव यांनी मांडलेली भूमिका तसेच वासुदेव मुलाटे यांनी व्यक्त केलेले मत लक्षात घेता कोणत्याही एका वैचारिक संप्रदायाची भूमिका न स्वीकारता सर्वसमावेशक अशी वैचारिक भूमिका ग्रामीण साहित्य चळवळीने घेतलेली दिसते. ग्रामीण समजाच्या आणि साहित्याच्या अभ्युदयाचे जे विचार असतील त्या सर्व विचारांची बांधिलकी स्वीकारत ही चळवळ पुढे जाताना दिसते. दुसऱ्या सब्दात सांगायचे झाल्यास, 'वैचारिक लवचीकता' या चळवळीने स्वीकारली आहे असे म्हणता येते. त्याच बरोबर, या चळवळीचा तात्त्विक भूमिकेबद्दल काही एक वैचारिक गोंधळ आहे का? असा प्रश्न ही निश्चितच निर्माण होतो. या चळवळीच्या तात्त्विक भूमिकेसंदर्भात गणेश देशमुख यांनी या तत्त्वज्ञानाची जी दुसरी बाजू सांगितली आहे ती तेवढीच महत्त्वाची आहे. या संदर्भातील मार्मिक विश्लेषण करताना ते म्हणतात, "भारतीय समाजाची मानसिकता लक्षात घेऊन या चळवळीने स्वीकारलेल्या या तत्त्वज्ञानाची दुसरी महत्त्वाची बाजू म्हणजे ही चळवळ 'क्रांतिवादी' नसून 'उत्क्रांतीवादी' आहे. विविध कारणांमुळे चिरफळया होऊन विभागल्या गेलेल्या भारतीय समाजात एका रात्रीत क्रांती होईल हा भाबडा आणि अतिरेकी विश्वास या चळवळीने कधीच बाळगलेल्या नाही. वर्ग, वर्ण, जाती, लिंगभेदनिष्ठ शोषण व्यवस्थेची, किंबहुना

सर्वच प्रकारच्या शोषणाविरुद्ध ही चळवळ आपली अशी वैचारिक भूमिका घेऊन उभी असलेली तरी आपल्या या व अन्य विचारांच्या प्राप्ती साठी असणारे मार्ग, साधने व विचार तिच्यापुरते स्पष्ट आहेत. केवळ मूठभर शोषितांनी आरडाओरडा, आक्रोश करून भारतीय समाजव्यवस्थेतील गुंतागुंतीच्या समस्या सुटणार नाहीत, सुटल्या नाहीत; याची जाणीव झाल्याने ही चळवळ व्यापक, समग्र पातळीवरच्या प्रबोधन मार्गाद्वारे भारतीय समाजमनावर परिवर्तनाच्या दृष्टीनेही मूलगामी असे संस्कार करुन, शोषक व शोषित या दोन्ही घटकांना त्यादृष्टीने घडवू इच्छिते. ग्रामीण साहित्याच्या या व्यापक भानाचा प्रत्येक 'ग्राम', 'ग्रामीण', 'ग्रामीण साहित्य' इत्यादी संकल्पनांची जी स्पष्टीकरणे या चळवळी कडून करण्यात आली आहेत त्यातूनही येतो.''[40] या एकूण विश्लेषणातून ग्रामीण साहित्याची तात्त्विक वा वैचारिक भूमिका स्पष्ट होते. अर्थात या नंतरही अनेक प्रश्न अनुत्तरीत राहतात व त्यांची उत्तरे शोधणे क्रमप्राप्त आहे.

**1.12 ग्रामीण साहित्य चळवीवरील आक्षेप:**

ग्रामीण साहित्याच्या चळवळीवर जे आक्षेप घेण्यात आलेले आहेत त्याचाही विचार करणे आवश्यक आहे. ग्रामीण साहित्याचे एक महत्त्वाचे अभ्यासक भास्कर भोळे यांनी या संदर्भात व्यक्त केलेले विचार निश्चितच अभ्यासनीय आहे ते म्हणतात, ''ग्रामीण चळवळीला तर स्वतःचे वेगळेपणही धडपणे प्रस्थापित करता आलेले नाही. या चळवळीतील लेखकांना त्यांच्या ग्रामीण पार्श्वभूमीमुळे, तसेच घरच्या गरिबीमुळे प्रचंड संघर्ष करावे लागले असले तरी जन्मसिद्ध अपात्रतांना कधीच तोंड द्यावे लागले नाही. समाजरचनेतील त्यांचे स्थान कधीकाळी घृणास्पद वा तिरस्करणीय होते असेही म्हणता यायचे नाही. उतरंडी समाजव्यवस्थेने ज्ञानाचे दरवाजे त्यांच्यासाठी बंद केले होते; हे खरे असले तरी, त्यांची पूर्वास्पृश्यांसारखी सर्वांगीण कोंडी केली होती असे दिसत नाही. आधीपासून लिहिणाऱ्या व ख्यातकीर्त झालेल्या काही ग्रामीण लेखकांनी त्यांना गरज वाटल्यामुळे या चळवळीची स्थापना केली आहे. लेखनातून स्वतंत्र अस्मितेचा शोध घेणे, ग्रामीण संस्कृतीचे वेगळेपण सिद्ध करणे किंवा त्या संस्कृतीचे जतन-संगोपन करणे, असे हेतू तिथे अभावानेच आढळतात. ज्योतीराव फुले यांचे नाव चळवळीच्या प्रवर्तकांनी पुढे कधीतरी आपले तत्त्वज्ञ-मार्गदर्शक म्हणून सांगितले असले तरी, फुल्यांच्या बहुसंस्कृतिवादी व मूलगामी बंडखोरीशी या चळवळीला कधीच फारसे कर्तव्य नव्हते. परिणामी स्वतःच्या सांस्कृतिक वेगळेपणाइतकीच अंतर्गत विविधतेबाबतही ही चळवळ बव्हंशी अनभिज्ञच राहिली.''[41] या एकूण चळवीवर त्यांनी जे आक्षेप घेतले आहेत ते निश्चितच विचार करायला लावणारे आहेत. या आरोपांच्या संदर्भात विचार करण्याअगोदर आणखी एक अभ्यासक महेश खरात यांनी या चळवळीवर जे आक्षेप घेतले आहेत

त्याचाही विचार करावा लागेल. मग सर्वांचा एकत्रित विचार करणे जास्त सोईचे होईल. महेश खरात म्हणतात, “ग्रामीण साहित्यिक आणि महात्मा फुले यांना ग्रामीण साहित्याच्या प्रेरणास्थानी ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला; पण फुले हे ग्रामीण साहित्याच्या प्रेरणास्थानी बसू शकत नाहीत. कारण फुले हे धर्माची चिकित्सा करतात. ग्रामीण साहित्यिक धर्माची चिकित्सा करीत नाही. फुले परंपरा नाकारतात. ग्रामीण साहित्यिक परंपरेला धरून आहेत. फुले देवा, धर्मा बरोबरच धर्मग्रंथांचे ऑडिट करतात. ग्रामीण साहित्य देवा धर्माबद्दल आदर बाळगला जातो. फुले सण-समारंभ, विधी, उत्सव यांचे समीक्षा विवेकाच्या पातळीवर करतात. ग्रामीण साहित्यात सण, उत्सव परंपरेला धरून येतात. फुले हे ग्रामीण माणसाची मानसिकता एक 'माणूस' म्हणून समजावून घेतात. ग्रामीण साहित्य ग्रामीण माणसाची मानसिकता लेखकाच्या दृष्टिकोनातून (चष्म्यातून) पाहतात. म्हणून फुले ग्रामीण साहित्याच्या प्रेरणास्थानी बसू शकत नाहीत. जर फुले यांना ग्रामीण साहित्याच्या प्रेरणास्थानी ठेवायचे असेल तर रीतिरिवाज, विधी, परंपरा, सण-उत्सव, देव, धर्म, रूढी यांनी विवेकाच्या पातळीवर ग्रामीण साहित्यिकांनी मांडणी केली पाहिजे.”[42] या दोन्ही अभ्यासकांनी या एकूण चळवळीवर जे आक्षेप घेतले आहेत त्यांचा विचार मुळापासून करणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ज्याप्रमाणे दलित चळवळ अगोदर सुरू झाली आणि दलित चळवळीचे साहित्य त्यानंतर निर्माण झाले तशी परिस्थिती ग्रामीण साहित्याच्या चळवळीमध्ये दिसत नाही. ग्रामीण साहित्य हे अगोदरपासून निर्माण होत असून ग्रामीण साहित्याची चळवळ मात्र नंतरच्या काळात निर्माण झाली आहे . त्यामुळे जे साहित्य प्रत्यक्षात अगोदरच निर्माण झाले होते त्याला तात्त्विक बैठक देण्याचा प्रयत्न हा नंतरच्या काळात करण्यात आला असेही म्हणता येते. त्यामुळेच, हे जे आरोप या चळवळीवर झाले आहेत त्यांचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. ग्रामीण साहित्याचा विचार करता, फुल्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सर्वात अगोदर आवाज उठवला असला आणि एकूण शेतकऱ्यांच्या परिस्थितीला कारणीभूत कोण आहेत, याची यथायोग्य चिकित्सा केली असली आणि त्यांनी निर्माण केलेले साहित्यही त्यादृष्टीने अभ्यासनीय असले तरी एखाद-दुसरा अपवाद वगळता त्यानंतरच्या काळात जे साहित्य ग्रामीण भागांमध्ये निर्माण झाले ते फुले यांच्या वैचारिक क्रांतीतून निर्माण झाले वा त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन निर्माण झाले असे दिसत नाही. ग्रामीण साहित्याच्या चळवळीतल्या पुरस्कर्त्यांनी देखील 1960 पर्यंतचे ग्रामीण साहित्य हे रंजनवादी परंपरेतूनच निर्माण झाले आहे हे मान्य केले आहे. त्यामुळेच, ज्या प्रमाणे दलित चळवळीतून प्रेरणा घेऊन दलित साहित्य निर्माण झाले त्याप्रमाणे फुल्याचा वैचारिक वारसा वा प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागली असे म्हणता येत नाही. 1978 नंतरच्या काळात ग्रामीण साहित्य चळवळीच्या पुरस्कर्त्यांनी महात्मा फुलेंचा उल्लेख

प्रेरणास्थान म्हणून केला असला व ही चळवळ व्यक्तिवादी नसून विचारवादी आहे असं म्हणून ग्रामीण माणसाच्या उथ्थानासंदर्भात ज्यानी-ज्यानी विचार मांडले आहेत त्या सर्वांचे ऋण ही चळवळ मानते असे म्हटले असले तरी, असा कोणताच वैचारिक वारसा या चळवळीने नंतरच्या काळात स्वीकारला आहे व नंतरच्या काळात जे ग्रामीण साहित्य निर्माण झाले ते या परंपरेशी नाते सांगणारे; नवे आत्मभान व्यक्त करणारे आहे असे दिसून येत नाही. अर्थात, या चळवळीच्या काही पुरस्कर्त्यांनी तसा दावा जरूर केला आहे. या संदर्भात गणेश देशमुख यांनी व्यक्तकेलेले मत लक्षात घेतले पाहिजे. ते म्हणतात, “ग्रामीण साहित्याच्या या तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष प्रत्यय या साहित्य प्रवाहातील साहित्यातून येतो काय? हाही या सैद्धांतिक भूमिकेसंदर्भातील  महत्त्वाचा प्रश्न! कारण केवळ वांझोट्या विचारांना जीवननिष्ठ कोणत्याही क्षेत्रात फारसे मूल्य व महत्त्व नसते. त्याचे उत्तर 'होय' असेच द्यावे लागेल. ग्रामीण साहित्याच्या प्रवाहात. ज्या धग, गोतावळा, पाचोळा यासारख्या कादंबऱ्यांचा गौरव केला जातो त्या कादंबऱ्यांचे नायक सर्वसामान्य ग्रामीण माणसेच आहेत. ज्या परिवर्तनवादी विचारांची या चळवळीने बांधिलकी स्वीकारली आहे त्याचा प्रत्यय देणाऱ्या अनेक साहित्यकृती गेल्या एक-दोन दशकात निर्माण झाल्या आहेत. नटरंग, झोंबी, चारापाणी, सावट,  इथे होता एक गाव, ‘असं जगणं तोलाचं’, गोबड, तहान, ऐसे कुणबी भुपाळ, कुणाच्या खांद्यावर अशी अनेक उदाहरणे देता येतील.[43] गणेश देशमुखांनी परिवर्तनवादी विचारांचा प्रत्यय देणाऱ्या म्हणून ज्या कादंबऱ्यांचा उल्लेख केला आहे त्यातून खरेच परिवर्तनाचा विचार आला आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरेल. या कादंबऱ्या म्हणून श्रेष्ठ असल्या, वास्तवाची मांडणी करणाऱ्या असल्या तरी त्या म. फुल्यांचा वैचारिक वारसा पुढे नेणाऱ्या आहेत असे म्हणता येत नाही. किंवा परिवर्तनवादी विचारप्राणालीचा वारसा त्या सांगतात असेही म्हणता येणार नाही. उदाः ‘ऐसे कुणबी भुपाळ’ मधून कोसळणारी कुटुंबव्यवस्था, बिघडणारे नातेसंबंध व यातून लयाला जाणारी ग्रामव्यवस्था यांचे दर्शन होते परंतु यातून म. फुल्यांच्या वैचारिकतेचा किंवा आणखी कोणाच्याही वैचारिकतेचा वारसा सांगत कादंबरीतून एखादी परिवर्तनवादी भूमिका लेखकाने मांडली आहे असे दिसत नाही. म्हणूनच भास्कर भोळे आणि महेश खरात यांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते गांभीर्याने लक्षात घेतले पाहिजेत.

**1.13 मराठी ग्रामीण कादंबरीची वैचारिक वा तत्त्वज्ञानात्मक परंपराः**

मराठीतील ग्रामीण साहित्याची वैचारिक वा तत्त्वज्ञानात्मक परंपरा तपासून पहायचे म्हटल्यास प्रारंभापासूनच्या मराठी ग्रामीण कादंबरीचा विवेचक आढावा घ्यावा लागेल.  म. फुल्यांची वैचारिक परंपरा स्वीकारून साहित्य निर्मितीलाही प्रारंभ झाला होता परंतु तो अत्यल्प ठरला. कादंबरी वाङ्मयाचा विचार करता कृष्णाराव भालेकर

यांची ‘बळीबा पाटील’, धनुर्धारी यांची ‘पिराजी पाटील’, मुकुंदराव पाटील  यांची ढढ्ढाशास्त्री परान्ने या कादंबऱ्या म. फुल्यांचा वैचारिक वारसा सांगणाऱ्या आहेत परंतु याची परंपरा निर्माण होऊ शकली नाही. कदाचित परंपरावादी, नियतीवादी, जातीच्या उच्चनिच्चतेच्या, दैववादी मनोवृत्तीत अडकलेल्या ग्रामीण समाजाला फुल्यांचा चिकित्सावाद पचवणे जड गेले असावे त्यामुळे चळवळीच्या मार्गदर्शकांनी म. फुल्यांचा वारसा सांगितला असला तरी वर उल्लेख केल्या कादंबऱ्यांचा अपवाद करता म. फुल्यांची वैचारिकता स्वीकारून साहित्य निर्मिती झाली नाही. त्यापेक्षा ही महत्त्वाचे म्हणजे, चळवळीच्या पुरस्कर्त्यांनी म. फुल्यांचा जयघोष केला तरी देखील या चळवळी नंतरच्या काळात जी ग्रामीण कादंबरी निर्माण झाली त्यावर देखील म. फुल्यांच्या विचाराचा प्रभाव दिसत नाही. ग्रामीण साहित्याच्या चळवळीतल्या पुरस्कर्त्यांनी देखील 1960 पर्यंतचे ग्रामीण साहित्य हे रंजनवादी परंपरेतूनच निर्माण झाले आहे हे मान्य केले आहे. त्यामुळेच, ज्या प्रमाणे दलित चळवळीतून प्रेरणा घेऊन दलित साहित्य निर्माण झाले त्याप्रमाणे फुल्याचा वैचारिक वारसा वा  प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्याची निर्मिती होऊ लागली असे म्हणता येत नाही. सुरूवातीच्या काळातील कृष्णराव भालेकर किंवा  धनुर्धारी यांच्या कादंबऱ्यांचा अपवाद करता, ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीमागची प्रेरणा ही रंजनवादीच राहिली आहे . 1920 नंतर महात्मा गांधीनी 'खेड्याकडे चला' अशी हाक दिली याचा प्रभाव तत्कालीन बऱ्याच कादंबरी लेखकांवर पडला. वा. म. जोशी, वि.स. खांडेकर, मामा वरेरकर अशी काही महत्त्वाची नावे या संदर्भात सांगता येतात. ग्रामविकासाच्या संदर्भात आपल्या कादंबऱ्यातून स्वप्नाळू आदर्शवाद जोपासण्याचा प्रयत्न या कादंबरीकारांनी केला. ग्रामउद्धाराची त्यांची तळमळ प्रामाणिक असली तरी प्रत्यक्षातातील गाव जीवनापेक्षा हे स्वप्नाळू आदर्शवादी ग्रामजीवन खूपच वेगळे असल्याने या कदंबऱ्या कृतकच ठरतात. त्यामुळे गांधीवादाच्या प्रभावातून मराठीत जी काही ग्रामीण कादंबरी लिहिली गेली ते ग्रामीण कादंबरीला कोणतेच तत्त्वज्ञान देऊ शकली नाही. फार तर काही एक स्वप्नाळू आदर्शवाद तिने निर्माण केला एवढे म्हणता येते. साधारणतः 1920 ते 1950 या कालखंडाचा विचार करता र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, बी. रघुनाथ, यांचा ग्रामीण कादंबरिकार म्हणून उल्लेख केला जातो त्यांनी ग्रामजीवनाचे चित्रण प्रभाविपणे केले आहे परंतु या सर्वच कादंबरीकारांनी गावातील समस्यांवर व तेथील वास्तवावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा कादंबरीच्या "रंजन मूल्याचा" जास्त विचार केला. तत्कालीन कादंबरी लेखनावर ना. सी. फडके यांच्या कादंबरी लेखनाच्या तंत्राचा जबरदस्त प्रभाव असल्याने हे झाले असावे त्यामुळे ग्रामीण कादंबरीचे काही वेगळे मापदंड निर्माण करण्याऐवजी लोकांचे मनोरंजन करणे एवढ्यापुर्तीच ही कादंबरी मर्यादित राहिली. व्यंकटेश माडगूळकरांच्या बनगरवाडीने मराठी ग्रामीण कादंबरीला

एक नवा आयाम दिला परंतु ती कादंबरी देखील त्रयस्थाच्या भूमिकेतून लिहिली गेल्यामुळे व एका वस्तीलाच केंद्रबिंदू ठरवून लिहिली गेल्याने ग्रामजीवनाचे तपशील ती पुरवू शकली नाही. विभावरी शिरूरकर यांची बळी आणि अण्णाभाऊ साठे यांची फकिरा या दोन कादंबऱ्यांचा मात्र मुद्दामहून उल्लेख केला पाहिजे कारण साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव या कादंबऱ्यांवर आहे. ग्रामीण भागातील किंवा ग्रामीण जनतेचे वास्तव दाखविण्याचा प्रयत्न या कादंबरीकारांनी केला आणि हे करीत असताना याला जबाबदार कोण, याचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न ही केला. या दोन कादंबऱ्यानी साम्यवादी विचारांचा प्रवाह ग्रामीण साहित्याला आणून जोडला असे म्हणता येते. अण्णाभाऊ साठे यांनी नंतरचे कादंबरी लेखन बहुतांशी रंजनाच्या पातळीवर केल्याने जी एक समर्थ ग्रामीण कादंबरी मराठीत निर्माण होऊ शकली असती ती झाली नाही. ‘धग’ या कादंबरीचे लेखन करून खरी ग्रामीण जाणिवेची कादंबरी मराठीत आणली ती उद्धव शेळके यांनी. या कादंबरीने इतिहास घडविला. शंकर पाटील यांची ‘टारफूला’ ही कादंबरी देखील ग्रामीण जाणिवांनी संमृद्ध अशी कादंबरी आहे. महत्त्वाचे म्हणजे एक गावच या कादंबरीचा नायक आहे.दुर्दैवाने हे लेखक देखील नंतरच्याकाळात या उंचीची कादंबरी पुन्हा लिहू शकले नाहीत ते ही निव्वळ रंजनात्मक कादंबरी लेखनाकडे वळले त्यामुळे कोणताच एक विचार मराठी ग्रामीण कादंबरीत प्रवाही राहू शकला नाही. हमीद दलवाई यांच्या ‘इंधन’ या कादंबरीचा ही या ठिकाणी मुद्दामहून उल्लेख केला पाहिजे. बदलत्या ग्रामीण जीवनाचा अत्यंत समतोल आढावा घेणारी आणि भविष्यात काय होईल याचे सूतोवाच करणारी ही कादंबरी आहे पण त्यांच्या अकाली निधनामुळे त्यांचे लेखन अर्ध्यावरच थांबले. ज्यानी ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू केली व म. फुल्यांना आपले प्रेरणास्थान मानले त्या आनंद यादव, रा. रं. बोराडे यांच्या कादंबऱ्यांचा विचार करता त्यांनी स्वतःच्या लेखनातूनही फुल्यांची चिकित्सावादी दृष्टिकोन स्वीकारल्याचे दिसत नाही. या संदर्भात आनंद यादव यांची गोतावळा व रा. रं. बोराडे यांची पाचोळा या दोन्ही कदंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. यात ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण आढळते पण फुल्यांची चिकित्सावादी दृष्टी मात्र दिसत नाही. ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण मराठी कादंबरीला कोणतेच वेगळे तत्त्वज्ञान दिले नाही हे खरे असले तरी, काहीच दिले नाही असेही म्हणता येणार नाही. महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण लेखकांना आत्मविश्वास दिला. विविध विषयांवर लिहिण्याची ऊर्मी त्यांच्यामध्ये निर्माण केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या लेखकांना आत्मभान आले. कादंबरी लेखन अधिक वास्तवाभिमूख झाले व त्यातील मनोरंजन मूल्य कमी होऊन गावातील स्थितीचे नेमके आकलन मांडण्यावर भर दिला गेला. या सर्वातून मराठी ग्रामीण कादंबरीचा चेहरामोहरा बदलला व ती अधिक सूक्ष्मतेने वास्तवाच्या विविध अंगांचे विश्लेषण करू लागली.

1980 नंतर काही प्रमाणात बदललेले ग्रामीण कादंबरीचे स्वरूप याची साक्ष देते. ग्रामीण संवेदनशीलता जागृत ठेवून 1980 नंतरचे कादंबरी लेखन होऊ लागले. त्यामुळे ऐंशी नंतरच्या कादंबऱ्या कृषिकेंद्रीत असल्या तरी विषयांचे वैविध्य या कादंबऱ्यातून दिसून येते. या संदर्भात काही कादंबऱ्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. पुरूषोत्तम बोरकर यांची 'मेड इन इंडिया' शेतकऱ्यांच्या एकूण हलाखीच्या स्थितीसाठी आपली एकूण व्यवस्थाच कशी कारणीभूत आहे याचे उत्तम विश्लेषण करते. भाषेचा अत्युत्तम वापर हे या कादंबरीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य! तसेच, खेडे व शहर यातील जगण्याचा झालेला तुलनात्मक विचार हे देखील याचे वेगळेपण म्हणून सांगता येते. उपहास, उपरोध यांच्या सहाय्याने केलेला बोचरा विनोद आपणाला हसवतो त्यापेक्षा ही अस्वस्थ करतो. मृत्युविषयक आलेले चिंतन या कादंबरीला एक वेगळा आयाम प्राप्त करून देते. एकूण मराठी ग्रामीण कादंबरीत ग्रामीणतेच्या कक्षा रुंदावणारी ही कादंबरी आहे. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'उलट चालिला प्रवाहो' आणि 'गांधारीचे डोळे' या दोन्ही कादंबऱ्या परिवर्तनाची दिशा सूचित करतात. म. फुल्यांचा चिकित्सावादी दृष्टिकोन काही प्रमाणात त्यांच्या कादंबऱ्यांमधून व्यक्त झाला आहे. राजन गवस यांच्या 'चौंडकं' आणि 'भंडारभोग' या कादंबऱ्या समाजातील कुप्रथांवर आघात करतात तर वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या' ही कादंबरी सहकार क्षेत्रातील अनागोंदीचे चित्रण करते. विश्वास पाटील यांची 'पांगिरा' ही कादंबरी पाणी प्रश्नाची तीव्रता मांडते. एकूणच 1980 ते 90 या दशकातील कादंबऱ्या ग्रामीण समस्या व अस्सल ग्राम जीवन अत्यंत ठळकपणे आपल्यासमोर मांडतात. त्यामुळे ग्रामीण माणसाचे दुःख केंद्रस्थानी ठेवून या कादंबऱ्यांचे लेखन झाले असून, ग्रामीण माणसाच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान या कादंबऱ्या व्यक्त करू लागल्या असे म्हणता येते. या सर्वांचा आढावा घेतल्यानंतर आपण या निषकर्षाप्रत येतो की ग्रामीण चळवळीने म. फुल्यांचा उल्लेख ग्रामीण चळवळीचे प्रेरणास्थान म्हणून केला असला तरी, प्रत्यक्षात फुल्यांचे तत्त्वज्ञान ग्रामीण कादंबरी स्वीकारू शकलेली नाही. फक्त ही चळवळ ग्रामीण साहित्याच्या साहित्याच्या विकासाला पुरक ठरली आहे. त्यामुळे भास्कर भोळे आणि महेश खरात यांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते किमान म. फुल्यांच्या प्रेरणेतून ग्रामीण कादंबरीची उभारणी झालेली नाही या संदर्भात तरी ग्राह्य धरावे लागतात.

**1.14 नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीची वैचारिक वा तत्त्वज्ञानात्मक परंपराः**

1990 नंतरच्या काळात एकूणच जगात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसते. तंत्रज्ञानाचा झालेला विकास आणि संगणक क्रांती यांनी या विकासात मोलाचे योगदान दिले. जागतिक स्तरावर कार्पोरेट क्षेत्राचा झालेला विकास आणि त्यामधून साकारलेले जागतिकीकरण यामुळे एकूण सर्वच व्यवस्थांची उलथापालथ झाली आणि त्याचे

गंभीर परिणाम ग्रामीण क्षेत्रावर झाले. 1990 नंतर भारत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामील झाल्यामुळे भारतात खाजगीकरण आणि उदारीकरणांची प्रक्रिया जोरात सुरू झाली. या सर्वाचा परिणाम लेखनावर होणे ही अपरिहार्य होते. 1980 च्या दरम्यानच भालचंद्र नेमाडे देशीवादाची मांडणी करीत होते. 1990 नंतर ज्या प्रकरच्या घडामोडी झाल्या, संस्कृतीच्या सपाटिकरणाला ज्या वेगाने सुरूवात झाली, स्थानिक भाषांचा संकोच ज्या जलद गतीने होऊ लागला व इंग्रजीचे प्रस्थ ज्या प्रकारे वाढू लागले, या सर्वाची प्रतिक्रिया म्हणून देशीवदी जाणिवा ही उफाळून आल्या. भालचंद्र नेमाडे ज्या देशीवादाची मांडणी करीत होते त्या देशीवादाचे प्रारूप कादंबरीकारांना विशेषतः ग्रामीण कादंबरीकारांना आपलेसे वाटू लागले व याला अनुसरून बऱ्याच प्रमाणात मराठी ग्रामीण कादंबरीचे लेखन होऊ लागले. भालचंद्र नेमाडे यांच्या देशीवादाची थोडक्यात चर्चा करायची झाल्यास प्रत्येक मानवी संस्कृती ही वैशिष्ट्यपूर्ण असते आणि तिला स्थल, काल, प्रदेशाचे निश्चित परिमाण असते. या सर्वाचे भान ठेवून लेखन करणे म्हणजे देशीवादी जाणिवेला अनुसरून लेखन करणे. आक्रमक संस्कृतीला विरोध करून स्वसंस्कृतीच्या काहीशा अभिनिवेशाने लेखन करणे म्हणजे देशीवाद असेही म्हणता येईल. नव्वदोत्तर काळात प्रामुख्याने लेखन करणारे राजन गवस, रंगनाथ पठारे, शेषराव मोहिते, किशोर सानप, भास्कर चंदनशिव, सदानंद देशमुख, रवींद्र शोभणे, भारत काळे, कृष्णात खोत, प्रवीण बांदेकर, आसाराम लोमटे, अशा बऱ्याच लेखकांवर काही एक प्रमाणात देशीवादाचा प्रभाव निश्चितच आहे. या ठिकाणी आणखी एक प्रश्न निर्माण होतो. ग्रामीण चळवळीचे पुरस्कर्ते ज्या म. फुल्यांना आपले प्रेरणास्थान मानतात त्या फुल्यांचे तत्त्वज्ञान व डॉ. भालचंद्र नेमाडेनी मांडणी केलेला देशीवाद याच्यात काही साम्यभेद आहे का, त्यामुळे यांच्यातील आंतरिक संदर्भ तपासून पाहणे आवश्यक आहे.

**1.15 म. फुल्यांचे तत्त्वज्ञान व देशीवाद**

ग्रामीण साहित्य चळवळीचे पुरस्कर्ते ज्या म. फुलेंच्या तत्त्वज्ञानाचा वारसा सांगतात त्यात आणि भालचंद्र नेमाडे यांनी दिलेले देशीवादी प्रारूप यात नेमका फरक काय आहे? म. फुल्यांच्या तत्त्वज्ञानाचा विचार केल्यास ते चिकित्सक भूमिका घेताना दिसतात. ते धर्माची, परंपरागत चालत आलेल्या व्यवस्थेची चिकित्सा करतात. आणि व्यवस्थेच्या गौरवीकरणाची भूमिका ते कुठेही घेताना दिसत नाहीत. देशीवादाच्या भूमिकेत मात्र आपल्या परंपरांच्या गौरवीकरणाची भूमिका स्वीकारल्याचे दिसते. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या चळवळीचे पुरस्कर्ते ज्या परिवर्तनवादी भूमिकेची अपेक्षा करतात ती प्रत्यक्षात मात्र कोणी स्वीकारताना दिसत नाही. त्यामुळे नव्वदोत्तर ग्रामीण मराठी कादंबरी ही म. फुल्यांचा परिवर्तनवादी, चिकित्सक विचार न स्वीकारता देशीवादी विचार

स्वीकारते असे दिसते.  कदाचित ही भूमिका स्वीकारणे ग्रामीण कादंबरीकाराला अधिक सोईचे वाटत असावे कारण गौरवीकरणाची भूमिका घेतली की चिकित्सा करावी लागत नाही. फक्त बारीकसारीक तपशील देऊन वास्तवाची मांडणी करणे समस्या मांडणे, दुःखाला वाचा फोडणे हे ती कादंबरी निश्चित करते पण चिकित्सा करीत नाही. फुल्यांचे साहित्य धर्माची, परंपरांची, व्यवस्थेची चिकित्सा करते पण अशी चिकित्सा आजच्या ग्रामीण कादंबरीतून अपवादानेच दिसते. राजन गवस यांच्या कादंबऱ्यांमधून ही चिकित्सा झाली आहे. 'तणकट' ही कादंबरी यादृष्टीने लक्षणीय आहे. त्याप्रमाणे 'ब-बळीचा' या कादंबरी मधूनही म. फुल्यांच्या विचारांची चिकित्सा त्यांनी केली आहे. 'बारोमास' मधून सदानंद देशमुख यांनी देखील एकूण ग्रामीण समस्यांमागील कारणांची चिकित्सा केली आहे. 'चाळेगत' मधून प्रवीण बांदेकर यांनी देखील ही चिकित्सा केली आहे. परंतु  इतरत्र मात्र फक्त वास्तवाचे दर्शन या पातळीवरच ही कादंबरी राहते. आजची मराठी ग्रामीण साहित्याची चळवळ दावा करते त्या प्रमाणे म. फुल्यांचे चिकित्सावादी तत्त्वज्ञान स्वीकारत नाही त्याचप्रमाणे देशीवादाची भूमिका देखील साकल्याने स्वीकारीत नाही असेही म्हणता येते. कारण देशीवादामध्ये आपल्या संस्कृतीचे, परंपरांचे अंधानुकरण अपेक्षित नाही तर त्यातील निवडक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींची निवड करून आधुनिकतेतून आलेल्या बदलांशी संवादी राहून त्यांची पुनर्स्थापना करणे अपेक्षित आहे. पण देशीवादाचे प्रारूप स्वीकारलेल्या मराठी कादंबऱ्या असे करताना दिसत नाहीत. उदाहरणार्थ जातीयतीची उतरंड त्यातील संघर्ष याचे चित्रण ग्रामीण कादंबऱ्यातून येते परंतु या कादंबरीच्या केंद्रस्थानी असलेल्या मराठा, कुणबी जातीतील युवकांनी दलित युवतींशी लग्नाचे नातेसंबंध स्थापून नवीन समाज रचनेच्या दृष्टीने पाऊल पुढे घातल्याचे वर्णन कादंबऱ्यांमधून येत नाही. अपवाद म्हणून फक्त बा. ह. कल्याणकर यांची 'पूर्वसंध्या' ही कादंबरी सांगता येते. आपली नष्ट होऊ लागलेली संस्कृती किती चांगली होती आणि आधुनिकतेमुळे पारंपरिक शेती आणि शेतकरी कसा उद्ध्वस्त होत आहेत याची मांडणी करतात परंतु आजच्या बदलत्या युगात ही भाबडी अगतिकता जपण्यापेक्षा नव्या आव्हानांचा सामना कसा करता येईल याची मांडणी होताना दिसत नाही. हे म्हणत असतानाच, अविनाश कोल्हे यांनी 'चौकट वाटोळी' आणि 'पंगतीतलं पान'  या कादंबऱ्यातून आधुनिकता आणि पारंपरिकता यांचा सांगड घालणारा नवीन दृष्टिकोन मांडला आहे. हे नोंदविले पाहिजे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण कादंबरीचा विचार करता तत्त्वज्ञानाची एक निश्चित बैठक मराठी कादंबरीला नसली तरी आता देशीवादी जाणिवा, म. फुल्यांचा चिकित्सावादी दृष्टिकोन, कार्पोरेट क्षेत्राचा वाढता भस्मासुर या सर्वांमधून जगण्याचा मार्ग आपणाला काढावा लागेल याची जाणीव आता

कादंबरीकारांना होऊ लागली असून या सर्वातून ग्रामीण कादंबरीचे एक नवे तत्त्वज्ञान आकाराला येऊ लागले आहे असे म्हणता येते.

**1.16 समारोपः**

मानवी जीवनातील ज्ञान प्रक्रिया ही भाषेमुळेच अव्याहतपणे चालू असते व त्यातूनच साहित्याची निर्मिती ही होत असते. मानवी जीवनातील विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून साहित्याकडे पाहता येते. साहित्याच्या अभ्यासात साहित्यिक विशेषांच्या अभ्यासासोबतच सांस्कृतिक विशेषांचा अभ्यासही महत्त्वाचा ठरतो. संस्कृतीचे वहन करण्याचे काम भाषा करीत असते व साहित्याच्या निर्मितीत संस्कृतीचे योगदान खूप मोठे असते. साहित्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेकांनी केला आहे परंतु एकच एक परिपूर्ण अशी साहित्याची व्याख्या आज पर्यंत कोणालाही करता आलेली नाही. साहित्यांचे विविध विशेष लक्षात घेऊन या व्याख्या करण्यात आल्या आहेत. कथात्मक, नाट्यात्मक, व भावकाव्यात्मक, हे तीन साहित्याचे मूलबंध म्हणून सांगितले जातात. कादंबरी हा साहित्य प्रकार यातील कथात्म मूलबंधाशी संबंधित आहे. साधारणतः अठरावे शतक हा कादंबरीचा उदयाचा काळ म्हणून सांगितला जातो. हा साहित्य प्रकार पाश्चात्त्य परंपरेत विकसित झाला आणि नंतर तो मराठीत स्थिरावला. अर्थात भारतीय साहित्य परंपरेतही त्याची मुळे शोधता येतात. विशेषता महाकाव्यात किंवा आपल्याकडे बखर वांङ्मयाची किंवा लोकसाहित्याची जी संमृद्ध परंपरा अस्तित्वात आहे त्याच्यातही या वाङ्मयप्रकाराची मूळे शोधता येतील. अर्थात, आजच्या मराठी कादंबरीचा विचार करता ती पाश्चात्त्य परंपरेतूनच विकसित झाली आहे असे दिसते. विविध व्यामिश्र जाणिवांना समग्रपणे आपल्या कक्षेत सामावून घेणारा साहित्यप्रकार म्हणून कादंबरीकडे पाहता येते. मराठीत सर्वच प्रकारच्या दीर्घकथनात्मक लेखनाला कादंबरी म्हटले जाते. इंग्रजी प्रमाणे 'नॉव्हेल्स'' आणि 'रोमान्स' अशा वेगवेगळ्या संज्ञा मराठीत अस्तित्वात नाहीत, त्यामुळे मराठी कादंबरीचा अभ्यास काहिसा किचकट होतो. जीवनाच्या सर्वचं अंगाना स्पर्श करण्याचे सामर्थ्य आधुनिक काळात फक्त कादंबरी या साहित्य प्रकारात कडेच आहे असे निश्चितपणे म्हणता येते. कादंबरीच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न आज पर्यंत अनेकांनी केला आहे. कादंबरी लेखनाच्या विविध वैशिष्ट्यांचा समावेश या व्याख्यां मधून दिसून येतो परंतु कादंबरी हा साहित्य प्रकार एवढा लवचीक आहे की त्याची एकच एक व्याख्या करणे कठीण आहे. कादंबरीच्या विविध व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर कादंबरीचे एकूण स्वरूप कसे आहे ते आपल्या लक्षात येते. कादंबरीचा आवाका, व्यापकता लक्षात घेण्यासाठी अनेक अभ्यासकांनी केलेल्या या कादंबरीच्या विविध व्याख्या लक्षात घ्याव्या लागतात. कादंबरीचे जे विविध विशेष दिसून येतात त्यावरून

कादंबरीचे काही उपप्रकार मानण्यात येतात, अर्थात यातील बरेच उपप्रकार हे अभ्यासाच्या सोयिसाठी किंवा त्या प्रकारच्या कादंबऱ्यांमधून त्यास्वरूपाचे जे विविध विशेष लक्षात येतात ते ठळकपणे नमूद करण्यासाठी हे प्रकार मानण्यात येतात. या सर्व प्रकारातील एक अत्यंत महत्वाचा उपप्रकार म्हणून आपणाला 'ग्रामीण कादंबरी'कडे पहावे लागते.

ग्रामीण कादंबरीचा विचार करता ग्रामीण कादंबरी हे मराठी कादंबरी वांङ्ग्याला लाभलेले सर्वात मोठे देशी परिमाण आहे असे म्हणता येते. ग्रामीण कादंबरीचा विचार करताना ज्याला खऱ्या अर्थाने ग्रामीण जाणिवांची कादंबरी म्हणता येईल अशी कादंबरी ही 1960 नंतर लिहिली जाऊ लागली हे आज सर्वच अभ्यासकांनी मान्य केले आहे. साठ नंतरच्या काळात ग्रामीण परिसरातून आलेला लेखक स्वतः घेतलेल्या अनुभवांना आणि तो ज्या परिसरात जगला, लहानाचा मोठा झाला त्या परिसराला तेथील भाषिक वैशिष्ट्यांसकट कादंबरीतून जिवंत करताना दिसतो. ग्रामीण कादंबरीच्या लेखनात त्या ठिकाणचा निसर्ग, त्या ठिकाणची भौगोलिकता आणि त्या ठिकाणची प्रदेश वैशिष्ट्ये या सर्वांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. ग्रामीण परिसरातील लोकसंस्कृती आणि त्या ठिकाणी बोलल्या जाणाऱ्या विविध बोली यांचा लेखनात केलेला वापर हे देखील ग्रामीण कादंबरीचे मोठे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. ग्रामीण कादंबरीतून भूक, दारिद्र्य, अज्ञान, शोषण आणि उपेक्षा यांचे विशेषत्वाने दर्शन घडते. ग्रामीण कादंबरी लेखनाला असलेला ऐतिहासिक संदर्भ महत्त्वाचा असतो. ग्रामीणता हे विशेषण नसून ते एक आशयिक मूल्य आहे. ग्रामीणतेचे सर्जनशील भान व्यक्त होणे हे ग्रामीण कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. महात्मा जोतिबा फुले यांच्याकडे ग्रामीण साहित्याचे उद्गाते म्हणून पाहता येते त्यांनी शेतकऱ्यांची वेदना साहित्यातून सर्वप्रथम मुखर केली. महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्य विषयीचे विचार आणि 'खेड्याकडे चला' हा त्यांनी दिलेला नारा ,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य, शाहू महाराजांचे समाजसुधारणेचे कार्य, या सर्व गोष्टी ग्रामीण कादंबरीला प्रेरणा देणाऱ्या ठरल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये ज्या विविध परिवर्तनवादी चळवळी निर्माण झाल्या त्यादेखील ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीला प्रेरक ठरल्या. हे सर्व लक्षात घेऊन ग्रामीणता हा लेखकाच्या जगण्याचा भाग व्हावा लागतो तेव्हाच त्याच्या साहित्यातून ग्रामीण संवेदना समर्थपणे व्यक्त होतात असे म्हणता येते. सामाजिक तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मराठी कादंबरी दुबळी आहे असे डॉ. हरिश्चंद्र थोरात यांच्यासारख्या मान्यवर अभ्यासकांनी म्हटले आहे. मराठी ग्रामीण कादंबरी ही त्याला अपवाद नाही हे खेदाने नमूद करावे लागते. ग्रामीण कादंबरीचे स्वतंत्र तत्त्वज्ञान उभारणे शक्य आहे हे ही या अभ्यासातून अधोरेखित झाले आहे. ग्रामीण साहित्याची चळवळ 1977 नंतर मराठी साहित्यविश्वात उदयाला

आली. या चळवळीने एकूण ग्रामीण साहित्याला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी ग्रामीण कादंबरीलाी तिची तात्त्विक बैठक देण्याचा प्रयत्न केला. परिवर्तनवादी, शोषण विरोधी, सुधारणावादी, विकसनशील असे सगळेच विचार या चळवळीने स्वीकार्ह्य मानले. व म. फुल्यांना आपले मार्गदर्शक ही मानले. म.फुल्यांचा वैचारिक वारसा या चळवळीने स्वीकारला असला तरी प्रत्यक्षात ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीच्या पातळीवर जावून निरीक्षण केले असता महात्मा जोतिबा फुले यांची चिकित्सक, बहुसंस्कृतिवादी भूमिका चळवळीनंतरच्या लेखकांनाही पेलता आली नाही हे लक्षात येते. त्यामुळे चिकित्सा करणारे आणि धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणासंबंधात पूर्णतः नव्याने मांडणी करणारी कोणतीही कादंबरी लिहिली गेल्याचे दिसत नाही.जी मांडणी मा. फुल्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाला अभिप्रेत आहे. उलट डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी प्रस्तुत केलेले देशीवादाचे प्रारूपाने नव्याने लेखन करू लागलेल्या लेखकांना जास्त भुरळ घालणारे ठरले आहे. आजची मराठी कादंबरी देशीवादाच्या अंगाने पुढे जाताना दिसत आहे. या प्रारूपामुळे ग्रामीण भागातील लेखक लिहिता झाला आहे हे निश्चित! पण त्यामुळे विशिष्ट तात्त्विक बैठक ग्रामीण कादंबरीला प्राप्त होत आहे असे दिसत नाही. एकूण विचार करता, ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण परिसरातील लेखकाला लेखनास प्रवृत्त केले, त्याला आत्मभान दिले व त्याच्यातील न्यूनगंड दूर केला असे म्हणता येते. ही चळवळ नेमकी तात्त्विक भूमिका देण्यास मात्र अपयशी ठरली. साहित्यातून साहित्य म्हणून किंवा लेखकाची लेखक म्हणून कोणतीच तात्त्विक भूमिका व्यक्त होत नसेल तर त्या साहित्याला सखोलता व खोली प्राप्त होत नाही. अशा कादंबऱ्यांतून परिपूर्ण जीवनजाणिवा व्यक्त होऊ शकत नाहीत. मराठीत श्रेष्ठ दर्जाची म्हणावी अशी कादंबरी लिहिली गेली नाही असे जे अनेक अभ्यासक म्हणतात त्याचे कारण तात्त्विक बैठक नसणे हेच आहे व डॉ. हरिश्चंद्र थोरातांसारख्या अभ्यासकांनी हे पुन्हा पुन्हा सांगितले आहे. मराठी ग्रामीण कादंबरीला वेगळया उंचीवर जायचे असेल तर तिला निश्चित तात्त्विक भूमिका स्वीकारणे अपरिहार्य आहे. ही भूमिका स्वीकारायची असेल तर तिला देशीवादाचा स्वीकार सोईप्रमाणे नव्हे तर डोळसपणे करावा लागेल. आपल्या निर्मितीच्या शक्यताना लोकसंस्कृती आणि लोकसाहिच्याची जोड द्यावी लागेल. या परंपरांमधूनच लोकजाणिवा समर्थपणे व्यक्त करणे शक्य होणार आहे. म.फुल्यांची चिकित्सक बहुसंस्कृतिवादी भूमिकेचा स्वीकार करणे आता ग्रामीण लेखकाला अपरिहार्य आहे. म. फुल्यांची भूमिका ही परिवर्तनवादी तत्त्वज्ञाची आणि चिकित्सेची आहे. व्यापक स्वरूपाची चिकित्सा केल्याशिवाय आता आपणाला पुढे जाता येणे ग़क्य नाही. हे पुढे जाणे परंपरेचा धागा पकडूनच पण चिकित्सक भूमिकेचा स्वीकार करून जावे लागेल.पारंपरिकता आणि परिवर्तनशीलता याचा समन्वय घडवून त्यातून आपली वैचारिक बैठक पक्की करून

लेखकाला आता पुढे जाणे भाग आहे. ही वाट अत्यंत बिकट आणि लेखकाची लेखक म्हणून परीक्षा घेणारी आहे. लेखकाला जीवनविषय विशिष्ट तत्त्वज्ञान मांडायचे असेल तर त्याला हे आव्हान स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही. हे आव्हान स्वीकारून जेव्हा ग्रामीण कादंबरीचे लेखन केले जाईल तेव्हा श्रेष्ठतम दर्जाची कादंबरी निश्चित लिहिली जाईल.

**निष्कर्ष**

1) साहित्य मानवी आयुष्याचे महत्त्वाचे अंग आहे.
2) भाषेच्या व्यक्त होण्याच्या प्रक्रियेतून साहित्याची निर्मिती होते.
3) साहित्य आणि संस्कृती यांचा अतूट संबंध असतो.
4) लेखकाला जे व्यक्त करायचे ते व्यक्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनुकूल अशा संप्रेषण पद्धतीच्या निकडीतून साहित्याचे विविध प्रकार निर्माण होतात.
5) कथात्म, नाट्यात्म आणि भावकाव्यात्म हे साहित्याचे तीन मूलबंध आहेत आणि या आधारे साहित्याचे वर्गीकरण केले जाते.
6) कादंबरी हा साहित्यप्रकार पाश्चात्त्य परंपरेतून विकसित झाला आहे.
7) कादंबरीची बिजे संस्कृत मधील महाकाव्ये व खंडकाव्ये यामध्ये शोधण्याचा प्रयत्न काही भारतीय अभ्यासकांनी केला आहे.
8) पोवाडे बखर इ. प्राचीन मराठी साहित्य परंपरांशी कादंबरीचा सांधा जुळणारा आहे.
9) प्राचीन मराठी साहित्य परंपरां मधून कादंबरी विकसित झाली असती तर ग्रामीण कादंबरी मुख्यधारेतील कादंबरी ठरली असती.
10) आधुनिकतेतून कादंबरी वाङ्मय प्रकाराचा उदय झाला आहे.
11) कादंबरीच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न आजपर्यंत अनेकांनी केला असला तरी एकच एक परिपूर्ण व्याख्या करणे आजपर्यंत कोणाला जमलेले नाही.
12) भरपूर लांबी असलेले कथानक, निवेदनाला असलेले महत्त्व, व्यापक आवाका, मानवी जीवनाचे सखोल दर्शन ही कादंबरीची महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतात.
13) वेगाने बदलणाऱ्या सामाजिक वास्तवाला आपल्या कवेत घेण्याचे सामर्थ्य फक्त कादंबरी याच साहित्य प्रकारात आहे.

14) कादंबरीचा रूपबंध लवचीक असल्याने या वाङ्मय प्रकाराला अधिक संपन्नता प्राप्त होते.

15) ग्रामीण कादंबरी हे मराठी कादंबरी वाङ्मयाला लाभलेले सर्वात मोठे देशी परिमाण आहे.

16) 1950 नंतर मराठी ग्रामीण कादंबरी वास्तवाभिमूख झाली

17) शिक्षणाचा प्रसार हे ग्रामीण कादंबरी लेखनांमागील एक महत्त्वाचे कारण आहे.

18) ग्रामीण कादंबरीच्या प्रेरणा प्रस्थापित मराठी कादंबरी पेक्षा पूर्णतः भिन्न आहेत.

19) ग्रामीण साहित्य हे भौगोलिक, प्रादेशिक आणि नैसर्गिक वैशिष्ट्यांनी जोडलेले असते.

20) कृषिकेंद्रीतता हे ग्रामीण कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

21) सर्जनशीलतेचे भान हे ग्रामीण कादंबरीचे वेगळेपण आहे.

22) अभिव्यक्ती साठी बोलीचा केलेला वापर हे ग्रामीण कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

23) ग्रामीणता हे विशेषण म्हणून नव्हे तर आशयिक मूल्य म्हणून व्यक्त होते.

24) लोकसाहित्य व लोकसंस्कृती याचा ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीवर निश्चित प्रभाव असतो.

25) लोकसाहित्य, म. फुलेंचे कार्य, म. गांधींचे कार्य, डॉ. आंबेडकरांचे कार्य, ग्रामीण भागात निर्माण झालेल्या चळवळी, मनोरंजन, वास्तवता आणि देशीवाद या ग्रामीण साहित्य निर्मितीच्या महत्त्वाच्या प्रेरणा आहेत.

26) ग्रामीण साहित्य हे लेखकाच्या अनुभवाचा आणि जगण्याचा भाग असल्याने ते अधिक संवेदनशील असते.

27) ग्रामीण कादंबरी अजूनतरी स्वतःचे असे वेगळे तत्त्वज्ञान प्रस्थापित करू शकलेली नाही.

28) ग्रामीण साहित्य चळवळीचे अनेक दावे शंकास्पद असले तरी ग्रामीण साहित्याला चालना देण्याचे काम ग्रामीण साहित्य चळवळीने निश्चितच केले आहे.

29) एखाददुसरा अपवाद वगळता 1960 पर्यंतची ग्रामीण कादंबरी रंजनवादी परंपरेतूनच लिहिली गेली.

30) 1960 नंतर परिवर्तनवादी विचार मांडणाऱ्या आणि ग्रामीण जीवनाशी इमान राखणाऱ्या कादंबऱ्या मराठीत लिहिल्या जाऊ लागल्या.

31) म. फुल्यांचे तत्त्वज्ञान ग्रामीण मराठी कादंबरीला अजूनही व्यवस्थित पचवता आलेले नाही.

32) नव्वदोत्तर काळात ग्रामीण कादंबरी लेखनांत काही प्रयोग झाल्याचे दिसतात.

33) नव्वदोत्तर काळात ग्रामीण माणसाचा जगण्याचा चाललेला तीव्र संघर्ष प्रखरतेने कादंबऱ्यांमधून आला आहे.

34) नव्वदोत्तर कादंबरीवर देशीवादाचा प्रभाव बऱ्यापैकी दिसतो.

35) फुल्यांच्या चिकित्सा वादापेक्षा परंपरांचे गौरविकरण करणारा देशीवाद अनेक ग्रामीण लेखकांना जास्त सोईचा वाटतो.

36) पारंपरिकता आणि परिवर्तनशीलता याच्या समन्वयातून मराठी ग्रामीण लेखकाला पुढे जावे लागेल

संदर्भ सूची


1) कऱ्हाडे, सदा, 'कादंबरी आणि कथा: एक अनुबंध', (संपा) जाधव, मा. मा. 'अक्षरगाथा (कादंबरी विशेषांक), वर्ष दुसरे, अंक पहिला, दुसरा, (जोड अंक), नांदेड जुलै-2011. पृ.19

2) थोरात, हरिश्चंद्र, 'कादंबरी एक साहित्य प्रकार, शब्द पब्लिकेशन्स्, मुंबई,2010, पृ.3

3) देशपांडे, कुसुमावती, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, 1954 पृ.15, 16

4) थोरात, हरिश्चंद्र, कादंबरी एक साहित्यप्रकार, शब्द पब्लिकेशन्स, मुंबई, 2010 पृ. 4

5) हस्तक, उषा, 'कादंबरी, भागवत, श्री. पु., व इतर(संपा.), 'साहित्य अध्यापन आणि प्रकार', मौज प्रकाशन, मुंबई, 2011, पृ. 252

6) हस्तक, उषा, 'कादंबरी', भागवत, श्री. पु., व इतर(संपा.), 'साहित्य अध्यापन आणि प्रकार', मौज प्रकाशन, मुंबई, दु.आ. 2011, पृ. 253

7) गणोरकर, प्रभा, व इतर (संपा), ' वाड्मयीन संज्ञा- संकल्पना कोश', जी. आर. भटकळ फाउण्डेशन, मुंबई, 2001, पृ.170

8) बापट, प्र., वा., गोडबोले, ना., वा., 'मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, 1973, पृ.36

9) कुलकर्णी, श्री., मा., 'कादंबरी रचना' उन्मेष प्रकाशन, नागपूर, 1956, पृ.13

10) कुलकर्णी, श्री., मा.,'कादंबरी रचना' उन्मेष प्रकाशन, नागपूर, 1956, पृ.14

11) Maurice Sheoder ' The Novel as a Ghetana essay included in the ' Theory of Novels' ed. by Philip Stevie. The free press, New York 1967, P.14

12) देशपांडे, मा., का., 'साहित्यसाधना' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे 1961, पृ.153

13) कुलकर्णी, श्री., मा., 'कादंबरीची रचना', उन्मेष प्रकाशन, नागपूर, 1956, पृ.15

14) बापट, प्र., वा., गोडबोले, ना., वा. ‘मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास’, व्हीनस प्रकाशन,1973, पृ.37

15) हस्तक, उपा, 'कादंबरी आणि मराठी कादंबरी (संपा.) श्री. पु. भागवत, प्रा. वाल. कुलकर्णी गौरवग्रंथ 'साहित्य अध्यापन प्रकार' मौज, पॉप्युलर मुंबई 1987, पृ. 253

16) देशपांडे, कुसुमावती, ' मराठी कादंबरीचे पहिले शतक', मुंबई मराठी साहित्य संघ दु.आ.1975, पृ.16

17) जोशी, लक्ष्मणशास्त्री, (संपा.) ‘मराठी विश्वकोश’, खंड-3, म.रा.सा.सं.मं., मुंबई, 1976, पृ.600

18) थोरात, हरिश्चंद्र, ‘कादंबरी एक साहित्य प्रकार’ शब्द पब्लिकेशन, 2010, मुंबई. पृ.3

19) नेमाडे, भालचंद्र, ‘टीकास्वयंवर’ साकेत प्रकाशन, आवृत्ती दुसरी, 2001 औरंगाबाद, पृ.244

20) सानप, किशोर, ' ग्रामीण आणि प्रादेशिक कादंबरीः संकल्पना आणि स्वरूप', (संपा) नंदपूरे, ईश्वर, 'साहित्य: ग्रामीण आणि दलित' विजय प्रकाशन, नागपूर 2002 पृ.54

21) गणोरकर, प्रभा, (संपादक),’वांङमयीन संज्ञा संकल्पना कोश, 2001, मुंबई, पृ.200

22) यादव, आनंद, ‘ग्रामीणताः साहित्य आणि वास्तव’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1981, पृ.13,14,15,16 व 17 वरील विश्लेषणांच्या आधारे.

23) भोसले, द., ता., ‘ग्रामीण साहित्य एक चिंतन’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2009, पृ.111

24) मुलाटे, वासुदेव, ‘ग्रामीण साहित्यःस्वरूप व दिशा’, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 2011, पृ.24, 25

25) वाल्हेकर, ज्ञानेश्वर, ‘ग्रामीण साहित्याची संकल्पना; टेकले, संग्राम, (संपा.) ‘मराठी ग्रामीण कादंबरी आस्वाद आणि समीक्षा’ शौर्य पब्लिकेशन, लातूर, 2017, पृ.26

26) सानप, किशोर, ' ग्रामीण आणि प्रादेशिक कादंबरीः संकल्पना आणि स्वरूप', (संपा) नंदपूरे, ईश्वर, 'साहित्य: ग्रामीण आणि दलित' विजय प्रकाशन, नागपूर, 2002, पृ.58.

27) यादव, आनंद, ‘ग्रामीणताः साहित्य आणि वास्तव.’ मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1981, पृ. 113, 114.

28) गव्हाणे, भाऊसाहेब, 'नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीः लोकतत्त्व आणि समाजजीवन', (संपा) जाधव, गजानन, 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी.' अनघादित्य प्रकाशन, अमरावती, 2021, पृ.288.

29) कोत्तापल्ले, नागनाथ,'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक': स्वरूप विचार, (संपा) नंदपूरे, ईश्वर, 'साहित्य: ग्रामीण आणि दलित' विजय प्रकाशन, नागपूर, 2022, पृ.39

30) कोत्तापल्ले, नागनाथ,'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक': स्वरूप विचार, (संपा) नंदपूरे, ईश्वर, 'साहित्य: ग्रामीण आणि दलित' विजय प्रकाशन, 2002, पृ.29

31) यादव, आनंद, 'ग्रामीणताः साहित्य आणि वास्तव,'मेहता पब्लिशिंग हाऊस', पुणे, 1981, पृ.117

32) नेमाडे, भालचंद्र, 'टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1990, पृ.214

33) थोरात, हरिश्चंद्र ' कादंबरीविषयी-', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००८ पृ.218

34) यादव, आनंद, ग्रामीणताः साहित्य आणि वास्तव, मेहता पब्सिशिंग हाऊस, पुणे, 1981, पृ.116

35) थोरात, हरिश्चंद्र, 'आजची मराठी कादंबरी नव्या वाटा', (संपादक) जाधव, मनोहर, देशमुख, श्रीकांत, नागनाथ कोत्तापल्ले गौरवग्रंथ, 'समकालीन साहित्यचर्चा 'प्रतिमा प्रकाशन, 2010, पृ.345,346.

36) थोरात, हरिश्चंद्र, 'आजची मराठी कादंबरी नव्या वाटा', (संपादक) जाधव, मनोहर, देशमुख, श्रीकांत, नागनाथ कोत्तापल्ले गौरवग्रंथ, 'समकालीन साहित्यचर्चा 'प्रतिमा प्रकाशन, 2010, पृ.344

37) यादव, आनंद, 'ग्रामीण साहित्य समाज आणि संस्कृती'मेहता पब्सिशिंग हाऊस, पुणे, 1985, पृ.68

38) यादव, आनंद, 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1985, पृ.78

39) मुलाटे, वासुदेव, 'ग्रामीण साहित्यःस्वरूप व दिशा', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, 2011, पृ. 21, 46

40) देशमुख, गणेश 'ग्रामीण साहित्याची सैद्धांतिक भूमिका', (संपा) नंदपूरे, ईश्वर, 'साहित्य: ग्रामीण आणि दलित' विजय प्रकाशन, 2022 पृ.20

41) भोळे, भास्कर, लक्ष्मण, 'बहुसंस्कृतिवाद आणि मराठी साहित्य' (संपादक) जाधव, मनोहर, देशमुख, श्रीकांत, नागनाथ कोत्तापल्ले गौरवग्रंथ, 'समकालीन साहित्यचर्चा 'प्रतिमा प्रकाशन, 2010, पृ.48, 49

42) खरात, महेश, 'ग्रामीण साहित्य: आस्वाद आणि आकलन', कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, 2008, पृ.22

43) देशमुख, गणेश ' ग्रामीण साहित्याची सैद्धांतिक भूमिका', (संपा) नंदपूरे, ईश्वर, 'साहित्य: ग्रामीण आणि दलित' विजय प्रकाशन, 2002, पृ.22